# प्रकरण तिसरे

## अखंडादि काव्या'तील विषय वैविध्य

## प्रकरण तिसरे

## अखंड रचना - विषय-वैविध्य

जोतिराव फुल्यांची भूमिका ध्येयवादी समाज प्रबोधकाची होती. जनजागृतीसाठी त्यांनी लेखणीचा वापर केला. समाजातील पाखंड पंडित, कर्मठ, ढोंगि लोकांवर धारदार शब्दांनी टीकेची झोड उठवली. समाज प्रबोधनासाठी त्यांनी प्रचंड मोठ्या धैर्याने लढा दिला. तत्कालीन सनातनी धर्मपंडितांच्या रीती, परंपरा, संस्कृतीचे उल्लंघन करणे म्हणजे आकाशाला गवसणी घालण्याचा प्रकारच होता. तरीही उमेद न खचता आपले कार्य त्यांनी चालू ठेवले होते. जोतिरावांना रानडे, लोकहितवादी सारखे कर्ते सुधारक अनुयायी म्हणून लाभले होते, पण तेही काही वेळा लोकदबावापुढे नमले होते.[१] रानडे आपल्या विधवा बहिणीचा पुनर्विवाह करु शकले नाहीत आणि लोकहितवादींनी रुढी प्रमाणे आपल्या नातवंडांचे बालविवाह संपन्न केले. या सारख्या त्यांच्या घटनेतून समाजाविरोधी जाण्याचे त्यांचे धाडस नसल्याचे जाणवते. पण जोतिराव मात्र वाटेल त्या संकटास सामोरे जाण्यास तयार होते. त्यांनी आपल्या वाङ्मय सुगंधाने सर्व जनमानसात जागृतीचे वारे निर्माण केले. शेतकऱ्यांचा आसूड, गुलामगिरी, इशारा इत्यादी त्यांच्या गद्य वाङ्मयातून शुद्रातिशुद्र, शेतकरी, कामकरी लोकांमध्ये नवा जोम, नवक्रांती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

जोतिरावांनी गद्य लेखनातून सर्वांगीण समाज सुधारणेचे व नवक्रांतीचे तत्व - ज्ञान मांडले त्याच प्रमाणे आपल्या काव्य रचनेतून बहुजन समाजाच्या अंत:करणात निर्माण झालेल्या नवक्रांतीच्या ठिणगीवर फुंकर मारली. जोतिरावांची काव्यरचना लोकहितार्थ जन्मलेली आहे. जोतिरावांनी जी काव्यरचना केली, त्यामध्ये शिवाजी राजेंचा पोवाडा, दस्यूचा पोवाडा, ब्राह्मणाचे कसब, अभंगरचना, मंगलाष्टके, अखंड रचना इत्यादींचा समावेश आहे. यापैकी पोवाडा, अभंग, मंगलाष्टके इत्यादींचा मागील प्रकरणात विचार केला आहेच. जोतिरावांनी लिहिलेली ` अखंड ` रचना ही जनजागरणासाठी केलेली उत्तम उपाय योजना म्हणणे वावगे ठरणार नाही.

जोतिरावांची अखंड रचना --

\जोतिरावांनी इ.स.१८६९ ते १८९० पर्यन्त काव्य-रचना केली. त्यांच्या काव्य रचने-पैकी `अखंड ` या काव्य प्रकारात विषय-वैविध्य प्रकर्षाने आढळते. फुल्यांनी जन्मभर विपूल काव्यरचना केलेली असूनही त्यांच्या काव्याबाबत काही लोकांना कल्पना देखील नाही, किंबहुना तत्कालीन समीक्षकांनी व विद्वानांनी हेतुपुरस्सर त्यांच्या काव्य-रचनेची उपेक्षा केलेली असावी. त्यांच्या काव्य रचने पैकी `अखंड ` ही काव्यरचना पारंपारिक मराठी कविते-पेक्षा वेगळी होती. जोतिरावांची अखंड रचना तुकारामादि संतांच्या अभंग रचनेस साधर्म्य दर्शक आहे./ वारकरी सांप्रदायातील नामदेव तुकारामादि संतांनी आपली पारमार्थिक तळमळ प्रकट करण्यासाठी `अभंग ` हे काव्याचे प्रभावी माध्यम अवलंबिले. बहुजन समाजाच्या काळजाला थेट जाऊन भिडण्याचे सामर्थ्य त्यांच्या अभंगामध्ये आढळते. अभंगाचे इंग्रजी वाङ्.मयातील भक्ती गीताशी बरेचसे साम्य आहे. अभंग या वाङ्.मय प्रकाराचा प्रारंभ ज्ञानेश्वरांच्या कालखंडात झाला. `अंत:करणातील अत्यंत गूढ व तीव्र भावना व्यक्त करणे हा अभंग वाङ्.मयाचा प्रधान हेतू आहे. अभंग म्हणजे विशेषत: जीवात्मा व ईश्वर यांच्या संबंधाविषयी वाटत असलेले उत्कट भावनांचे उद्गार होत.` या पद्यप्रकारा-द्वारे समाजातील भोंदूगिरी, ढोंग, बुवाबाजी, अंध - श्रध्दावर टीकेची झोड उठविली आहे. अल्पज्ञानावर टेंभा मिरवणाऱ्या, चार संस्कृत श्लोक पाठ करुन पांडित्याची ढोंगबाजी करणाऱ्या कर्मठांवर टीका करताना तुकाराम म्हणतात --

` अर्थेविण पाठांतर कासया करावे,
व्यर्थचि मरावे घोकूनिया
घोकूनिया काय, वेगी अर्थ पाहे
अर्थरुप राहे होऊनिया
तुका म्हणे ज्याला अर्थी आहे भेटी
नाही तरी गोष्टी बोलू नका ` २

समाजात पुजाविधिचे स्तोम माजविणाऱ्या , मूर्तिपूजा व त्या समोर दिलेले पशु-पक्षी, प्राण्याचे बळी या सारख्या अंधश्रध्देवर टीका करताना नामदेव म्हणतात

' म्हणताती देव मोठमोठे । पूजिताती दगड गोटे ।

जीत जिवा करुनि वध । दगडा दाविती नैवेद्य ।[३]

नामदेव - तुकारामादिंच्या अभंगातून परखडपणे टीका केलेली जाणवते. अभंग रचनेतील भाषा आणि रचना साधी सोपी असल्याने फुल्यांना हा काव्यप्रकार आवडला असावा. जोतिरावांना स्वत:स कवींच्या मालिकेत गोवून घ्यायचे नव्हते. आपल्या जीवनकार्याच्या सिध्दीसाठी त्यांनी पद्यरचना करुन जन जागृती केली. संतांच्या अभंगवाणीतून पारमार्थिक तळमळ व्यक्त होते पण जोतिरावांच्या अखंड रचनेतून शुद्रातीशुद्रांच्या उध्दाराची, समाज प्रबोधनाची तळमळ प्रकट होते. जोतिरावांची ही अखंड रचना एकूण पाच विभागात सुयोग्यपणे गुंफले आहे. यामध्ये ९९९ अखंडांचा समावेश आहे. विविध विषयांचा समावेश अखंडामध्ये केलेला आहे. धर्म, नीती, सहिष्णूता या सारखे बोधपर विषय आहेत. मोंदू, गुरु,ब्राह्मणांचा मोंदूपणा भटाची वाणी या विषयांद्वारा समाजातील स्वैराचार व मोंदुगिरीवर टीकास्त्र सोडले आहे. बळीराजा,मानवमहंमद सारख्या महात्म्यांची महती गाऊन समाजासमोर आदर्श ठेवला आहे. सयाजीराव गायकवाड,गंगाराम भाऊ मस्के या सारख्या प्रसिध्द व्यक्तींना पद्यमय पत्रव्यवहार करुन आपली आंतरिक तळमळ व्यक्त केली आहे.' तुका म्हणे' या धर्तीवर जोतिरावांची पद्य रचना आहे.(अखंडातील त्याचे विचार मौलिक संघर्षप्रवण आणि प्रक्षोभक आहेत असे गं.बा.सरदार आपले मत मांडतात.

विभाग पहिला

धार्मिक ऐक्य - समभाव --

' धर्म,' या शब्दाची उत्पत्ती धारण करावा या धातू पासून झाली. जो सर्व मानवांना धारण करतो त्यास' धर्म ' म्हणतात अशी धर्माची ढोबळ

व्याख्या केली जाते. पवित्र वस्तूंशी संबध्द असलेली विश्वास (श्रध्दा ) आणि आचार यांची एकजिनसी व्यवस्था म्हणजे धर्म होय[4] सत्याचे दर्शन अथवा सत्याचा अनुभव ज्याद्वयातून घडतो त्यास ' धर्म ' म्हणतात. सत्यनिष्ठा आणि मानव जातीबाबत आदर हे हिंदु धर्माचे ध्येय धोरण आहे. सर्व मानवजातीस समाविष्ट करुन घेऊन पददलितांचे दु:ख परिमार्जन करणे हे धर्माचे प्रयोजन होय. पण हे प्रयोजन गेल्या काही शतकापासून साध्य होत नाही.

भारतातील धार्मिक जीवन अनेक पदरी व गुंतागुंतीचे आहे. विविध धर्म संस्थांची येथे सरमिसळ झालेली आहे. हिंदू ,मुसलमान,ख्रिस्ती ,बौध्द, जैन , पारशी असे अनेक संप्रदाय प्रचलित आहेत. प्रत्येक धर्मातील पूजाविधी,उपासनापध्दती, स्थानिक दैवते वेगवेगळी आहेत. धर्म संरक्षण करणाऱ्या पंडितांनी आपापल्यापरीने संस्कृती आणि धर्मतत्वांचे संरक्षण व प्रसार केला. काही धर्मपंडितामध्ये स्वार्थी भावना संचारली, हिंदु धर्मातील ब्राह्मणांनी सर्व वर्णांमध्ये आपण श्रेष्ठ असल्याचे शिक्कामोर्तब केले. आपले श्रेष्ठत्व कायम राहावे म्हणून मनुस्मृती सारख्या ग्रंथात वाटेलतशा कल्पना घुसडून दिल्या[5]. धर्माच्या साखळदंडांनी मानवी समाज हळुहळू जखडला जाऊ लागला तेव्हा मात्र धर्मा-धर्मात अंतर्गत संघर्ष चालू झाले.धर्म जीवनातील अंधश्रध्दा, कर्मकांड, रुढिदास्य,पुरोहितशाही यांच्याविरुध्द या सुधारणावादी चळवळीने आवाज उठविला.सनातन पुराणमतवाद्यांनी हा आवाज दाबून टाकण्याचा प्रयत्न केला. मुसलमान धर्मात सूफी संप्रदायाने धर्म सुधारणेचा प्रयत्न केला.ख्रिस्ती धर्मामध्ये कॅथॉलिक चर्च व पोपशाही यांच्याविरुध्द प्रोटेस्टंट पंथाने फार मोठी चळवळ उभारली. लूथर कॅल्व्हिन प्रभृती धर्मसुधारक 'बायबल' मानत , पण चर्चची मध्यस्थी व हुकूमत त्यांना नको होती[6]. हिंदुधर्मातील पुरोहित-शाहीच्या दंभाचा स्फोट करण्याचे सुधारणावादी चळवळीने ठरविले. धर्मभावनेचे आधुनिकीकरण करण्याची दृष्टी काही समाजसुधारकांना प्राप्त झाली होती. यामध्ये राजाराम-मोहन रॉय पासून लोकहितवादी, फुले,रानडे,आगरकर इत्यादींचा समावेश होतो.

जोतिराव फुल्यांनी भिक्षुकशाहीवर आणि उच्चवर्णीयांच्या धार्मिक गुलामगिरीवर अत्यंत कठोरपणे हल्ला चढविला. पण तसा जोतिरावांचा पिंड

धार्मिकच होता. मुसलमान, ख्रिस्ती धर्माबाबत ते खूप स्तुती करीत. मानवास सामावून घेणारी धर्मतत्वे त्यामध्ये आढळत होती. हिंदु धर्मात जातिभेदामुळे खूपच अमानवी वृत्ती बोकाळली होती म्हणून त्यांनी धर्मांतर केल्याचे कुठेच आढळत नाही. पण हिंदु धर्म तत्वांचे आधुनिकीकरण जोतिरावांना कराव्याचे होते. सर्वांना सामावून घेणारा 'सत्यधर्म' त्यांना स्थापन कराव्याचा होता. 'सर्व साक्षी जगत्पती। त्याला नको मध्यस्ती।' हे तत्व समाजात त्यांना रुजवायचे होते. सर्व मानव-जातीचा 'एकच धर्म' असावा असा त्यांचा विश्वव्यापक दृष्टिकोन होता म्हणून ते म्हणतात --

'मानवांचे धर्म नसावे अनेक ।।
निर्मीक तो एक ।। जोती म्हणे ।।

जोतिराव कट्टर एकेश्वरवादी होते. त्यांची विचारसरणी मात्र बुध्दिवादावर आधारलेली आहे. फुल्यांचा ईश्वर हा विश्वनिर्माता आहे म्हणून ईश्वरास ते 'निर्मीक' म्हणतात. त्याने आपणास निर्माण केले आहे. आपल्या कल्याणासाठी 'निर्मीक' प्रयत्नशील आहे. तो सर्वांचा धनी आहे. त्याने सर्व मानवासाठी एकच पृथ्वी, सूर्य, चंद्र इ. निर्माण केले असता एकाच निर्मीकाने निर्माण केलेल्या मानवांत धर्मभेद का ? असा प्रश्न ते धर्म पंडितांना करतात. ईश्वर आणि मानव यांच्यातील फुल्यांना अभिप्रेत असलेला संबंध ईश्वराकडून मानवाकडे असा एकतर्फी आहे. कोणतीही अपेक्षा न ठेवता ईश्वराने मानवजातीची सर्व व्यवस्था केली आहे. ईश्वर चिंतनाने तो आपणावर खूष होईल अथवा दुर्लक्ष केल्याने रागवेल हा सर्व भ्रम आहे. तो विश्वा पेक्षा श्रेष्ठ व विश्वाच्या पलिकडे आहे. मानवांसाठी ज्या सुविधा त्यांने निर्माण केल्या आहेत. त्यांचा उपभोग न्यायाने न भांडता घ्यावा आणि बंधुभाव निर्माण व्हावा अशी निर्मीकाची अपेक्षा आहे. पर्जन्यवृष्टी, अपत्य प्राप्ती, प्राणवायू निर्मिती या सर्व ईश्वरी किमया आहेत. पुरोहितशाहीच्या जप-अनुष्ठानांने त्या प्राप्त होत नाहीत म्हणून जोतिराव म्हणतात --

जप अनुष्ठाने माऊस पाडिती ।।
आर्य कां मरती ।। जळावीण ।।

भटांच्या दांभिक आणि भोंदू वृत्तीवर जोतिरावांनी परखडपणे टीका केली आहे.

इराणातून आलेल्या या आर्यांनी भारतात खूप मोठा धुमाकूळ माजवला. सर्वसामान्य लोकांचा अमानवी छळ केला, स्त्रियांवर अत्याचार केले ' बुडती हे जन। न देखवे डोळा। या तुकारामांच्या उक्ती प्रमाणे जोतिरावांना मानवांचा चाललेला छळ पाहावत नव्हता म्हणून ते भटशाहीचे दुष्टकृत्य समाजासमोर मांडून सर्व मानवजातीस आपल्या ' सत्यधर्म ' तत्वांनी उपदेशाचे डोस पाजू लागले.

उपदेश --

धर्म सुधारणेतून समाज प्रबोधन हे जोतिरावांचे जीवन ध्येय होते. बंधुभाव - सत्याचरण व साचारता यांचा अवलंब केल्याने समाज प्रबोधन सहज शक्य असल्याचा आत्मविश्वास जोतिरावांना होता. आपल्या गद्य-पद्यादि ग्रंथनिर्मितीच्या माध्यमाने जोतिरावांनी सर्व समाजास उपदेश केला आहे.

' सत्यनिष्ठा ' हे मानवी जीवनाचे सर्वात महत्वाचे तत्व आहे. आपली आचार संहिता सत्यनिष्ठ स्वरुपाची असावी. आळशी न बनता प्रत्येकाने आपल्या कार्याशी एकनिष्ठ राहून सुखाने आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करावे. आपल्या मुला-मुलींना नित्यनियमाने शाळेत पाठवावे. जोतिराव फुले सामान्य लोकांप्रमाणे विद्वानांनाही उपदेश करतात ते म्हणतात --

विद्वान लोकांनी विद्यादान द्यावे।
भिक्षेकरी व्हावे।। गावा मध्ये।।

ज्याच्या घरी अठराविश्व दारिद्र्य आहे अशांनी सुध्दा विद्या संपादन करावी. फार तर पोटापूर्ते भिक्षान्न मागून आपल्या अध्ययनांशी दक्ष असावे. विद्वानांनी स्त्री-पुरुषांसाठी शाळा उघडाव्यात. समाज प्रबोधनासाठी खर्च केला तर ते खऱ्या अर्थाने पुण्यकर्म होय. स्वार्थासाठी व स्वत:साठी जे खर्च करतील त्यांची प्रगती होण्या-ऐवजी अधोगती अटळ आहे असे मत जोतिराव मांडतात. दुर्जनांना कोणत्याही प्रकारची मदत करु नये असे ते म्हणतात. त्यास सत्कार्य केल्यास त्यांच्या दुष्ट कृत्यास आपण सहकार्य केल्यासारखे आहे. खोटे बोलणारे, मद्यपी, दुष्ट यापासून दूर रहावे. ख्रिस्ती, इस्लाम, बौध्द व सर्व जाती-धर्मांच्या लोकांना बंधुत्वाची वागणूक द्यावी.

आपल्या बुध्दीच्या सामर्थ्यावर संपत्ती मिळवावी. गरीबांना त्या संपत्तीच्या रुपाने मदत करावी.समाजात व्यक्ती स्वातंत्र्य आहे तसेच भाषण स्वातंत्र्यसुध्दा आहे. मातृभाषेचा प्रत्येकास आदर असावा. सभा,व्याख्याने व्हावीत. आपला स्वभाव सद्गुणी असावा.इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. यावनी भाषा आत्मसात करावी.बहुभाषिक होण्याचा प्रयत्न करावा त्यामुळे त्या व्यक्तीस कुठेही भाषिक अडचण पडत नाही. सामान्यपणे चाळीसाव्या वर्षानंतर बुध्दीवान लोकांनी शाळा तपासण्याचे कार्य करावे. आपले अनुभव इतरांना सांगून त्यांच्या वर्तमान, आचरणात सर्वांगीण सुधारणा करावी. जोतिराव सामान्य जनतेस उपदेश करुन समाज प्रबोधनाचा प्रयत्न करतात. जोतिरावांनी स्त्री पुरुष समानतेबाबत आपली मतप्रणाली आग्रहाने मांडली आहे. स्त्री-पुरुषामध्ये कोणताही भेदभाव न मानता समान हक्काने सर्वांनी राहण्याची तत्वप्रणाली श्रेष्ठ होय पण हिंदु धर्मातील उच्चवर्गीयांना याची जाण नसावी ते अहंभावाने फुगलेले आहेत. सोवळ्या-ओवळ्यांनी सामान्यांचा छळ ते अखंडपणे करतात. शूद्रांना दासाप्रमाणे वागवून त्यांचा छळ करण्याची ब्राह्मणवर्गाची पुर्वापार परंपरा आहे. या वर्गाची स्वार्थी वृत्ती घटने - घटनेतून जाणवते. कष्टाळूपणा त्यांच्याकडे नाही. कष्टविरहित जीवन जगणे हा त्यांचा स्थायीभाव होता आणि हेच जोतिरावांना पसंत नव्हते.त्यांच्या भोंदू - गिरीस ऊत आला होता. या भोंदू साधूवर जोतिराव कडाडून हल्ला करताना म्हणतात --

शिरी जटा भार । मृगचर्मी वस्त्र ।
वाची आर्यशास्त्र । साधू झाला ।।

या प्रकारच्या वाया गेलेल्या साधूंची संख्या समाजात जास्त प्रमाणात वाढत आहे असे जोतिराव मत मांडतात. हे साधू म्हणजे जणू दुर्गुणांची खाणच आहे. सामान्यांची लूट केल्याने त्यांच्याकडे द्रव्य संचय खूपच झाला आहे. अर्थात त्यामुळे हे भोंदू साधु व्यसनी बनत चालले आहेत.

स्त्री-पुरुषांना समान हक्काने वागविण्याऐवजी स्त्रियांचे बरेचसे हक्क केवळ हिंदुधर्म तत्वामुळे हिरावून घेतले गेले.पुरुष विधूर झाल्यास पुनर्विवाह करतो पण

विधवांना पुनर्विवाहाची बंदी आहे. स्त्रीजातीवर हा फार मोठा अन्यायच आहे. आर्य लोकांचा हा केवळ स्त्रीजातीवरच अन्याय नाही तर शुद्रांनाही त्यांनी खूप छळले आहे. धर्मतत्वामुळे त्यांना अगदी पशुप्रमाणे जीवन जगावे लागते. मनुस्मृती ग्रंथाचा आधार घेऊन ब्राह्मण समाज अस्पृश्यांचा अनन्वित छळ करतात. अज्ञानी शुद्रांना छळणे हे त्यांचे जणू जीवित कार्यच असते पण तो इंग्रजांना मात्र खूपच घाबरतो असा हा ब्राह्मण समाज देशद्रोही आहे.

कल्पनेचे देव त्यांनी निर्माण केले, त्यांच्या पुजाविधिसाठी सामान्यांची लुबाडणूक केली. समाजातील सर्व भोंदूगिरी या समाजापासून उदयास आली. स्त्री वर्गावर तरी त्यांनी खूप अन्याय केला. जी स्त्री मानवाची जननी आहे, तिच्यावर आर्य पाखंडानी स्वार्थी बुध्दीने धर्माच्या नावाखाली अन्याय केला.

जोतिराव म्हणतात असा एखादा गुणी ब्राह्मण दाखवा आम्ही त्याचे कौतुक करु.

जगी असा दावा । संसारी ब्राह्मण ।।
त्याचेच चुंबन ।। आम्ही घेऊ ।।

ज्याप्रमाणे सुईच्या अग्रावर मोहरी थांबू शकत नाही किंवा कमळदळास पाणी चिकटत नाही त्याप्रमाणे ब्राह्मणाचे देही सत्कर्म आढळत नाही. मानव ब्राह्मण असो व कोणत्याही जातीचा असो जो मानवांवर अन्याय न करता भावंडाप्रमाणे वागतो संपत्तीच्या गर्वाने गर्वोन्नत्त न बनता सहकार्य भावनेने वागतो तोच खरा मानव होय. जोतिरावांना `ब्राह्मण` या विशिष्ट वर्गाबाबत द्वेष नव्हता पण त्यांच्या `ब्राह्मण्या` बाबत राग होता. गुणी ब्राह्मणाबाबत फुल्यांच्या मनात आदर होता त्यांच्या सत्यशोधक चळवळीत किती तरी ब्राह्मण अनुयायी होते, गुणी मानवाचे ते कौतुक करतात. त्यांना खऱ्या अर्थाने गुणज्ञ मानतात. हा समाज जर निर्मळ, निर्दोष विचारी असेल तर समाजात खूप परिवर्तन होऊ शकेल, असा विचार जोतिराव मांडतात. ब्राह्मण समाजास सद्वर्तनाच्या उपदेश करताना ते म्हणतात --

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

इशो केले नाही तुजसाठी सर्व ।
करु नको गर्व ।। प्राण्यांमध्ये ।।
देह देऊनीया बुध्दिमान केला ।।
धनीपणा दिला ।। सर्वांमध्ये ।।

आपण देह जगाच्या कल्याणासाठी खर्च करावा, जो सद्‌गुण संपन्न, सत्यवादी ,धैर्यशील जितेंद्रिय आहे तोच खरा सज्जन होय. अंतर्मुख होऊन आत्म-परिक्षण केल्याशिवाय आपल्यातील सत्यतेचा शोध लागणार नाही म्हणून जोतिराव प्रत्येकास आत्मपरिक्षण करण्यास प्रवृत्त करतात.

आत्मपरिक्षण --

प्रत्येकाने अंतर्मुख होऊन आत्मपरिक्षण करावे त्यांनाच खरे ज्ञानी,बुध्दिमान म्हणता येईल.माणसाने आपल्यावरुन जग ओळखण्यास शिकले पाहिजे.आत्म - परिक्षणामुळे आपल्या चुका सहज लक्षात येतात. दुसऱ्याचे दोष काढत बसण्यापेक्षा प्रथम स्वत:चे दोष नष्ट केले पाहिजेत. आत्मपरिक्षण करणारी व्यक्ती सद्‌गुणी होऊ शकते.ती दुसऱ्याच्या यशामध्ये संतोष मानते,सहकार्य भावना निर्माण होते. प्रत्येकाने ही भूमिका केल्यास संपूर्ण मानव जात विवेकी बनेल,विश्वबंधुत्व प्रस्तापित होईल.

आर्यांनी आत्मपरिक्षण केल्यास त्यांना आपली विजयाची शिखरे सहज पहाव्यास मिळतील,त्यांनी भारतातील भिल्ल,कोळी सारख्यांचा पराभव करुन त्यांना दास बनविले.त्याचे मानवी हक्क हिरावून घेतले. शूद्रांवरील अत्याचाराला तर सीमाच नव्हती. याबाबत सावित्रीबाई फुले म्हणतात --

स्वथुंकी थुंकाया गळी गाडगे ते ।
खुणा नाशाया ढुंगणी झाप होते ।[9]

तरीही उच्चवर्णीय स्वत:स महान,भूदेव मानतात.अंतर्मुख होऊन त्यांनी कधीही आत्मपरिक्षण केले नाही. आत्मपरिक्षण हा शब्दच त्यांनी हद्दपार केला होता. जोतिराव स्वैराचारी आर्यांना उपदेश करताना म्हणतात ---

मग आर्यांमध्ये पाहू जाता खूण ।
एक आत्मा जाण ।। दोघांमध्ये ।।

दोघेही मानव, सारखे हक्क, इच्छा असताना हा भेदभाव का ? सर्वजण सुखाची व जीवनातील स्वास्थ समाधानासाठी झटत असताना हा धर्मभेद जातिभेद मानवाने का निर्माण केला ? स्वत:च्या सुखासाठी स्वार्थी व दुष्ट बुध्दीने दुसऱ्यास पिडले तर अर्थातच त्याचे आत्मज्ञान नष्ट होते, तो अविचारी बनतो. सर्व मानवाचे हक्क सारखे असताना आर्यांनी अधिकारशाही का गाजवावी ? त्यांनी निर्माण केलेले विषारी वेद मानवजातीचा संहार करणारे आहेत. या वेदामुळे सर्व समाजात कलहाचे वातावरण निर्माण झाले आहे. निदान आता तरी आत्मपरिक्षण करुन आपल्या वर्तनात व आचरणात बदल करा, यावेळी जोतिराव संतापाने म्हणतात --

भ्रष्ट आर्य तुम्ही सद्गुणी कां व्हा ना ।
आता पुरे झाले सोंग भूदेवाचे ।।
शरण जाऊनी त्यांची क्षमा मागा ।।

आपल्या मनातील न्यूनगंड जाणून आत्मपरिक्षण करुन वर्तनामध्ये बदल करण्याचा उपदेश जोतिराव करतात. स्वत:स सुखप्राप्तीची गरज असल्यास धैर्याने व सत्याने आचरण करा. दुसऱ्यांना आपणापासून कोणताही उपद्रव देऊ नका. दुसऱ्यांना सुखी करण्याचा प्रयत्न करा, तरच तो सुखी होईल. आत्मपरिक्षण हेच खरे बुध्दिवादाचे लक्षण होय.

दैवीगुण --

मानवाने विवेकबुध्दीने आत्मपरीक्षण केल्यानंतर त्यास आपल्या गुण दोषांची जाणीव होते. त्याच्या आचरणातून लोकांना त्याची विवेकी वृत्ती आणि दर्जा जाणवतो. जोतिराव फुले आपल्या सत्यधर्माव्दारे समाजास काही दैवी गुणाची महती सांगतात, त्याचा अवलंब केल्यास ती व्यक्ती सद्सद्विवेकसंपन्न बनू शकते. नीतिमत्ता, धैर्यशिलता, समाधानीवृत्ती, सहिष्णुता या सर्व दैवी गुणांचा मनोहर मिलाप झाल्यानंतर सद्सद्विवेक-संपन्नतेला बहर येतो.

(अ) नीती --

जोतिराव फुले नीती बाबत म्हणतात आपल्या सर्वांच्या निर्मिकास संतोष देण्यासाठी सार्वजनिक सत्याचे भय मनात धरून जो कोणी इतर मानव-बांधवाबरोबर आचरण करील त्यासच नीती म्हणावी. ' सार्वजनिक सत्यधर्म ' या पुस्तकात त्यांनी एक प्रकारची मानवाची आचारसंहिता सांगितली आहे. विवेकी आणि सत्य आचरण करणाऱ्या मानवाची आपल्या सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात एकूण तेहतीस लक्षणे सांगितली आहेत.[8] या लक्षणाचा अवलंब करणाऱ्या व्यक्तीसच सद्वर्तनी म्हणता येईल खऱ्या नीतीबाबत जोतिराव म्हणतात --

कोणास न पीडी कमाके खाई ।।
सर्वासुख देई ।। आनंदात ।।
खरी हीच नीती ।। मानवाचा धर्म ।।
बाकी अधर्म ।। जोती म्हणे ।।

पृथ्वीतलावर निर्मिकाने अनेक स्त्री-पुरुष निर्माण केले. त्यामध्ये काही बुध्दिमान निपजले. वास्तविक निर्मिकाने सामान्यांच्यासाठी बुध्दिमान लोक निर्माण केले. प्रत्येकास आपल्या कर्तव्याची जाणिव करुन दिली. हे सर्व ईश्वराने केले असता कुणाला त्रास न देता सुखासमाधानानी सर्वांनी राहणे हे खऱ्या नीतिमत्तेचे लक्षण होय. पण मानवाच्या मनातील स्वार्थभावना नष्ट होत नाही. सहकार्य करण्याची त्याच्याकडे वृत्ती नसते. आपली संपत्तीच काय पण साधी एखादी वस्तू कोणी घेवू नये असे त्यास वाटत असते. सर्वकाही आपणासच मिळावे, सर्वामध्ये सधन आपणाच असावे असे त्यास वाटत असते. स्वत:वरुन जग ओळखण्यास मानवाने शिकले पाहिजे. आपण समाजात सत्याने वागत असू तरच इतर लोक आपणांशी सत्याने वागण्याचा प्रयत्न करतील. सत्य हाच खरा धर्म आहे. सत्यापासून आपण जर परावृत्त झालो तर मनात कुठे तर टोचण लागते. विवंचना लागतात. बुध्दीची झीज अकारण होते. आराम मिळत नाही. जर त्यास अंत:करणपूर्वक समाधान व

व मानसिक स्वास्थ हवे असल्यास कुनीतीचा त्याग करुन सत्यधर्माचे आचरण करावयास हवे.

सत्याचरण केवळ आपणापुरते मर्यादित न ठेवता त्याचे डोस आपले आप्तस्वकीय, सगेसोयरे, मित्रमंडळी व भावंडांना द्यावेत. त्यामुळे आपले हित होतेच शिवाय अनेक लोक सद्मार्गाला लागतात. सत्याचरणाचे ज्ञान इतरांना सांगताना एखादा ताठर दुर्गुणी भेटल्यास त्याचा द्वेष करावा. सद्वर्तनाने मानवास मिळालेल्या सुखाचे खूप वाटेकरी असतात त्याची गोचर फळे चाखण्यास तयार असतात. पण दु:खाचा वाटेकरी कोणीही होवू शकत नाही. म्हणून स्वत: सद्वर्तनी आचरण करावे व इतरांना सन्मार्गी लावावे यातच जीवनाचे खरे यश आहे. या संदर्भात मानवास आमोष दाखवताना जोतिराव म्हणतात --

तुझ्या हितासाठी जगी सत्य धर ।।
निर्भीक आचार ।। सत्य ठायी ।।

देश, धर्मभेद, जातीभेद व सर्वस्वाचा त्याग करुन सत्याचरण करावे. मानवाचे हेच खरे भूषण आहे. परमेश्वर नेहमी त्याच्या पाठीशी उभा असतो. जोतिराव जनतेस उपदेशात्मक नीतिमत्तेचे धडे शिकवतात. भोंदूगिरी, फसवेगिरी, अन्याय यामुळे अप्रत्यक्षरित्या आपण आपला नीतिधर्म पायधुळी तुडवल्याप्रमाणे होते. ज्यांच्याकडे खऱ्या अर्थाने प्रामाणिकपणा आहे तो त्याच्या आचरणातून दिसून येतो. तो कृतज्ञ, नम्र, सौजन्यशील, कर्तव्यदक्ष असतो. समाजात सहकार्य भावनेने वागणे, सत्याचरण करणे हीच खरी नीती होय.

(ब) धीर --

'धीर धरी रे धीरा पोटी । असती मोठी फळे गोमटी' या केशवसुतांच्या उक्तीप्रमाणे मानवी देहात धीर असल्यास सर्व गोष्टी सहजशक्य साध्य होतात. धीरामुळेच मानवी जीवनात उर्मी निर्माण होते आणि साहस वाढते. धीराचे महत्त्व सांगताना जोतिराव म्हणतात --

धीर असल्याने प्रसंग पडता ।
निर्धारे वर्तता ।। यश येई ।।

केवळ धीरापोटीच आपल्या मनात आत्मविश्वास निर्माण होतो. आत्मविश्वासामुळेच आपली विधाने निर्धारात्मक असतात. अर्थातच आपण योजिलेल्या कामात यश मिळते.यशाची खरी गुरु-किल्ली ' धीर' होय. मानवाच्या अंतरी धीर असल्यास तो दु:ख ,पिडा, संकटांना हसतमुखाने तोंड देतो. त्यांच्याकडे सहनशिलता वाढते. तो रंजले गांजलेल्यांना सहकार्य करतो. त्याचा सर्वत्र लौकिक पसरतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपल्या हृदयात 'धीरास' आश्रय द्यावा. आयुष्यातील सर्व वेळ सत्यवर्तनासाठी खर्च करावा. त्यामुळे त्याचे मन निर्मळ बनते शिवाय शारीरिक स्वास्थ मिळते.

धीरामुळे मानव गुणी बनतो.समाजात सत्याचरण करतो.अर्थात यामुळे त्याची सर्व अरिष्ठे नष्ठ होतात.

मानवाने जर धीर सोडला तर त्याची खूप दयनीय अवस्था होते.कोणत्याही गोष्टीबाबत आत्मविश्वास निर्माण होत नाही. हिम्मत हारते. अनेक संकटे कोसळतात. स्वभाव भिडस्त बनतो.मनात भिती निर्माण होते. वाईट घटना आपल्या हातून घडतात. सतत चिंता लागते. वाईट कार्ये उघडी पडतात. सर्व समाजात नाचक्की होते. धीर सोडणाऱ्या माणसाची काही उदाहरणे जोतिराव देताना म्हणतात --

मित्र,शूद्र वेडे, अज्ञानी बापूडे ।
आर्य पाइ पडे, लज्जा गेली ।।

एवढेच काय पण शूर असणाऱ्या मांग-महारादिंना आर्यांनी पशूवत केले. जर शूद्राकडे धीर असता तर त्यांच्यावर गुलामगिरीचा प्रसंग आलाच नसता.आर्यांनी त्यांना पशूवत बनवलेच नसते.

सत्याचरण केल्याद मन निर्मळ ठेवण्याची जबाबदारी ईश्वराची असते.जर मानवाचे आचरण सत्यधर्मानुसार असेल तर तो धर्माच्या जाचक बंधनास आणि गुलामी तत्वांना दाद देत नाही. मनात तो धर्मतत्वांचे निर्दालन करतो. काही समाजकंटक,धर्मांध लोक मात्र धर्मतत्वाशी चिकटून असतात.सत्याचरण ते करत नाहीत. धर्मतत्वांच्या नावाखाली सामान्यांना छळतात.पण नेमकी धर्मतत्वे त्या सामान्यांना दाखवीत नाहीत. आर्यांनी खोटया वेदांच्या आधारे शूद्रांना खूप छळले म्हणून या आर्यांना जोतिराव तिरस्काराने म्हणतात ---

सत्य वर्तण्याचा आर्या नाही धीर ।।
धूर्त अगोचर । ा खरा मंड ।।
खोटे वेद मनू अंतज्ञा दावीना ।।
मैदानी आणीना ।। जोति म्हणे ।।

सत्याचरणाशिवाय मानवास ख-या अर्थाने समाधान लाभत नाही. निर्मिकाचा दबाव मानवाच्या मनावर असल्यास तो साहजिक सत्याचरण करतो. सत्याचरणामुळे मानवाच्या मनातील भीती नष्ट होते आणि धीरत्व प्राप्त होते अर्थात या धीरत्वामुळे तो आत्मविश्वासपूर्वक जीवनाची वाटचाल करतो.

(क) <u>समाधान</u> --

संसारात तृप्त असणा-या माणसांची खरी खूण ` समाधान ` होय.आजपर्यन्त दुष्टकृत्ये करणा-या माणसांना उपदेश करताना जोतिराव म्हणतात --

दुष्ठकर्मे तुम्ही अजिबात टाका ।।
पुढे नाही धोका ।। मुला बाळा ।।
झाले गेले सर्व मनी झुरु नका ।।
सत्यकर्मी विका आपुल्यास ।।
खरे समाधान भोगा सावकास ।।
आनंद जगास जोति म्हणे ।।

निर्मिकाने पृथ्वीतलावर अनेक प्राणीमात्रास निर्माण केले. त्यांना आवश्यक असणारी साधने दिली.त्यांच्या पालनपोषणाची जणू जबाबदारी घेतली. सर्व प्राणीमात्रामध्ये मानव प्राण्यास इतरापेक्षा जास्त बुध्दी दिली केवळ मानवप्राणीच सत्याचरण करु शकेल अशी निर्मिकाची अपेक्षा होती. म्हणून तर निर्मिकाने हा सर्व खटाटोप केला. मानवाने एकमेकांशी बंधूभावाने वागावे.रंजले गांजलेल्यांना मदत करावी अशी मनीषा निर्मिकाची होती. पण मानवप्राणी कृतघ्न बनत आहेत . निर्मिकाचे उपकार जाणतसुध्दा नाहीत. ` परपिडा ` हे मानवाचे दुषण असूनही जगात अनेक लोक सामान्यांना छळतात.त्यांना उपदेश करताना जोतिराव म्हणतात --

कृतज्ञ होऊनी मानी समाधान ।।
तृप्तीची ती खूण ।। जोति म्हणे ।।

मानवी जन्म धारण केलेल्या प्रत्येकाने समाधानी असावे असे मत जोतिराव मांडतात. त्यासाठी सत्याचरण करावे त्यामुळे त्यास मानसिक, आत्मिक समाधान लाभत असते. असमाधानी माणसाची अवस्था वर्णीताना जोतिराव म्हणतात --

हेळसांड करी नीयत वृत्तीची ।। मान दुर्गुणाची संसारात ।।
सरकारावर व्यर्थ रागावतो ।। स्नेहास निंदी ती ।। कधीमधी ।।

अशा लोकांची बुध्दी नष्ट होते. अनेक विवेचनानी ते आयुष्यात तळमळत राहतात. पुढे त्यांना काही मानसिक विकार होतात. रोगग्रस्तामुळे संतप्त बनतात. दातओठ खातात. तरीही अल्पशा ज्ञानावर टेंभा मिरवितात. मीच स्वतः श्रेष्ठ आहे असे जगास दाखवितात. अशा लोकांना निर्मिकाची कसलीही भीती नसते. त्याचे समाधान केव्हाच हद्दपार झालेले असते ते समाजात वाटेलतशी वाईट कृत्ये करतात. साधूसंताना सुध्दा छळतात. या दुष्ट आचरणामुळे ते अगदी रसातळाला जातात. अखेर पश्चाताप करतात. शुध्दीवर येतात अशा लोकांना जोतिराव उपदेश करताना म्हणतात --

सुमार्गी लागता होती महाजन ।।
होतसे कल्याण ।। पदोपदी ।।
समाधानी वृत्ती ज्यांची अखंडीत ।।
सुखात मंडीत ।। जोति म्हणे ।।

धर्मतत्वाच्या आधारे सामान्यांचा छळ केला जातो. सॉक्रेटिसासारख्या भल्या माणसास विष पाजून मारले जाते. असमाधानी लोकांनी जणू खाटीकाचा धंदाच स्वीकारलेला असतो. या दुष्टांनीच धर्म ग्रंथ लिहले ते काल्पनिक आहेत जोतिराव म्हणतात --

स्वर्गाची शांतता कल्पून मनात ।।
लिहली ग्रंथात ।। तर्कबळे ।।
कोठे आहे स्वर्ग पाहिले ते कुणी ।।
भिऊ नका मनी दावा आम्हा ।।

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

धर्मग्रंथावर टीका करुन जोतिराव असमाधानी प्रवृत्तीकडे झुकणाऱ्या मानव प्राण्याबाबत दु:ख व्यक्त करतात. अज्ञानी रयतेचे उदाहरण देतात. या रयतेचा राजा असंतोषी होता व प्रधान तामसी, दुष्ट, शिपाई दुर्जन असून प्रजा दारुबाज, भांडखोर आहे अशा मानवप्राण्यांना पाषाणाची उपमा देऊन त्यांना कधीही समाधान मिळणार नाही असे मत जोतिराव प्रकट करतात . या दुष्टांच्या फळाबाबत ते म्हणतात --

ज्यांची जशी कार्ये तशी फळे देती ।
वळण लावती संतानास ।।

सर्व दुष्ट कर्माचा त्याग करुन अजूनही मानवप्राण्याने सत्याचरण करुन समाधानी यशस्वी जीवन जगावे असे जोतिराव जनतेला उपदेश करतात.

(ड) सहिष्णुता --

मानवाच्या सद्गुणसंपन्न, विवेकी शांत सोशिक वृत्तीस सहिष्णुता म्हणतात. सहिष्णुते-शिवाय मानसिक समाधान होत नाही. पण समाजातील कित्ती तरी लोक या सहिष्णुतेपासून दूर असतात. त्यांच्या अंत:करणात विवेकी शांत सहनशील वृत्ती पैदा संतस्त ,तामसीवृत्ती खूप असते. किरकोळ कारणावरुनही ते खूप आरडा ओरड करतात. गहजब माजवितात. हे दुष्ट लोक कित्ती तरी दुष्टकृत्ये करीत असतात पण त्यांच्यावर थोडा जरी अन्याय झाला तरी ते चिडून उठतात.

सहिष्णुतासंपन्न लोक अत्यंत शांत आणि समाधानी वृत्तीचे असतात.

ठेविले अनंते तैसेची राहावे ।
चिती असू द्यावे समाधान ।।

या तुकाराम महाराजांच्या तत्वाप्रमाणे त्याचे आचरण असते. आपणावर कित्तीही मोठी आपत्ती आली तरी ते मनात झुरत बसत नाहीत. कोणत्याही प्रकारची खंत त्यांना नसते. त्यांच्याकडे हिम्मत असते पण त्यासाठी त्यांच्या अंतरी कधीही क्रोध अथवा सूड भावना नसते. आपण स्वत:रोगग्रस्त असली तरीही ईश्वरास दोष

देत नाहीत. नशीबाच्या नावाने ओरडत नाहीत. घरी कुरकूर करत नाहीत. या त्यांच्या वृत्तीमुळेच त्यांना आत्मिक सुख मिळते कारण सहिष्णुता हेच खरे आत्मिक सुख आहे असे त्यांना वाटत असते.प्रत्येक व्यक्तीच्या अंगी हा सहिष्णुता गुण असल्यास सर्व समाज विवेकी, निरुपद्रवी शांत बनल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येक व्यक्तीच्या मनात आपआपसाबाबत आदर भावना सहजच निर्माण होऊ शकते. सहिष्णुतासंपन्न माणसांची सहनशीलता पराकोटीची असते. याबाबत जोतिराव म्हणतात --

सहिष्णुता खरी मांग महारांची ।।
फजीती आर्यांची ।। जोति म्हणे ।।

मांग महारांसारख्या अत्यंत कार्यदक्ष शूरवीरांना या आर्यांनी बली-स्थानात येऊन खूप छळले. द्रव्य लोभासाठी त्यांनी तेथील क्षत्रियांना लुबाडले. व्देषबुध्दीने त्यांना पिळले. त्यांना गुलाम बनविले.अस्पृश्य मानले.त्यांना अज्ञानी ठेवण्याच्या उध्देशाने लिहण्यास बंदी केली .आर्यांनी राजरोसपणे एवढा अन्याय,अत्याचार,जुलूम व गुलामगिरी चालवली तरीही बलीस्थानातील क्षत्रिय, शूद्र, मांग, महार संयमानेच वागत होते. सूड भावनेने त्यांचा नाश करण्याचे धैर्य त्यांच्यामध्ये नव्हते.

सहिष्णुतासंपन्न, संयमी लोक समाजात कुणालाही उपद्रव करीत नाहीत पण दुष्ट लोक किती तरी वाईट कृत्ये करतात. त्यामुळे जीवनात येणारी संकटे भोगतात. आपणास त्यामुळे दु:ख क्लेश झाल्यास निर्मिकाच्या नावाने शंख करतात. आपण केलेली दृष्टकृत्ये सांगण्यास त्याला लाज वाटते.पण देवाची फजिती करण्यास कमी करत नाहीत म्हणून जोतिराव म्हणतात --

सहिष्णुता नाही अशा सोंगाड्यास ।।
खऱ्या नास्तिकास ।। जोति म्हणे ।।

निर्मिकाने निर्माण केलेल्या प्राणीमात्रांना कमी जास्त प्रमाणात बुध्दी दिली असली तरी ठराविक वर्गास ती पिढीजाद दिलेली नाही. स्त्री-शूद्रांमध्ये किती तरी बुध्दिमान मानव आढळतात. सर्व मानवप्राण्यांना समाजात वावरण्यासाठी सारखे हक्क असताना आर्यांनी शूद्रांच्या मानवी हक्कावर गदा का आणावी ? द्रव्यलोभासाठी त्यांनी एवढा गोंधळ माजवला. धर्मतत्वांच्या नावाखाली सर्वांना गुलाम बनविले.

सर्व समाजास यांची जाणीव करुन देण्यासाठी सत्यधर्माची कल्पना येण्यासाठी जोतिराव प्रयत्न करीत होते `सार्वजनिक सत्यधर्म` या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी आर्थिक समस्या निर्माण झाली. त्यांचा एक बालपणीचा मित्र मोरो विठ्ठल वाळवेकर `यांनी जोतिरावांना असणारी द्रव्य तूट भरुन काढली.[९]

सार्वत्रिक सत्यग्रंथ रचियेला ।। त्यास छापण्याला ।। द्रव्य तूट ।।
शूद्रादिक कीव येताच मानवा ।। देशस्थ बांधव ।। मर्दापरी ।।
ग्रंथ छापण्याची केली सुरुवात ।। प्रती वीस शत ।। एकदम ।।
विक्री झाल्यावर दाम घेणे बोली ।। टोचणी ही दिली ।। चिक्कू शूद्रा ।।
मोरो विठ्ठल वाळवेकर देह । सहिष्णू अखंड ।। मुंबापुरी ।।
सद्‌सद्‌विवेकी, सुबोधाचा दाता ।। गृहीणीचा पिता । जोति मित्र ।।

जोतिरावांचा हा शेवटचा ग्रंथ त्यांच्या मृत्युनंतर १८९१ मध्ये प्रसिध्द झाला.[१०] या ग्रंथाची पहिली आवृत्ती वाळवेकरांनी छापून प्रसिध्द केली. आपल्या` सत्यधर्म ग्रंथ` पठनाने समाजात परिवर्तन होऊ शकेल. नवीन सार्वजनिक सत्यधर्माच्या तत्वांचा अवलंब मानवप्राणी करतील. सर्वत्र बंधूभाव व सर्वगुणसंपन्नता फेलावेल या उद्देशाने जोतिराव सत्यधर्म प्रत्येक सादराने वेळात वेळ काढून वाचावा त्यातील तत्वे आचरणात आणावित असा कळकळीचा संदेश जनतेला देतात. दुष्ट, व्यसनी, सर्व विकृतींनी ग्रासलेल्या लोकांनी जरी हा ग्रंथ वाचला तरी ते विवेकी बनतील सर्वत्र विश्वबंधूत्व निर्माण होईल. धर्मजातिभेदाचे समूळ उच्चाटन होईल असा आत्मविश्वास जोतिरावांना वाटतो म्हणून आपल्या सत्यधर्म पठनासाठी जनतेला उपदेश करताना ते म्हणतात —

थोडे दिन तरी मद्य वर्ज करा ।।
तोच पैसा भरा ।। ग्रंथासाठी ।।
ग्रंथ वाचिताना मनी शोध करा ।।
देऊ नका थारा ।। वैरभावा ।।

धर्मांध लोक जुन्या तत्वप्रणालीशी एकनिष्ठ असतात. धर्मतत्व आणि सत्य याची कुठेच सांधेजोड होत नाही, याची जाणीव असताना हे कर्मठ धर्मांध लोक धर्मतत्वासाठी

-

वेळी अवेळी संघर्ष,रक्तपात करतात. पिढयानपिढयामध्ये वैरभाव निर्माण करतात. सर्व जगाला दु:ख देतात. म्हणून त्यांच्याबाबतचा उल्लेख करताना जोतिराव म्हणतात --

सहिष्णुतेवीण नाही समाधान ।।
एकीस बंधन ।। जोति म्हणे ।।

(इ) सद्विवेक --

नीती,धीर,समाधान,सहिष्णुता या गुणांचा अंगीकार झाल्यानंतर अंत:करणात ' सद्विवेक ' बहरतो. प्रत्येक व्यक्तीने सद्विवेकबुध्दीने आपले कार्य केल्यास सर्वत्र शांतता आणि समृध्दी नांदेल. समाज अनुकरणप्रिय आहे. एका व्यक्तीने जरी सद्विवेकबुध्दीने समाजात आचरण केल्यास त्याचे अनुकरण अनेकजण करतील म्हणून जोतिराव म्हणतात --

दृढमनी धरा सद्विवेकास ।।
तेच संतानास ।। सुख देई ।।
जगहितासाठी सत्याने वर्तती ।।
हित ते करीती ।। स्वत:चेही ।।

स्वार्थासाठी आपण जर इतरांना त्रास देत असू आणि प्रत्येकाने हेच तत्व अवलंबले तर सर्वत्र अविवेक फैलावला जाईल. आपणांवरही कुणाचा तरी अन्यायाचा बडगा असेल म्हणून सर्वांनी सद्विवेकाने आचरण करा त्यामुळे पुढे कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नाही. पण समाजातील अनेक लोक सद्विवेकास दुर्लक्षितात धर्माच्या तत्वाखाली सामान्यांना छळतात. जप, अनुष्ठान रुपाने जनतेस लुबाडतात. पराक्रमी मांग - महारांना दास बनवितात. धर्मभेद मानून समाजात अकारण गोंधळ माजवितात.स्वार्थासाठी वाटेल ते करतात. इंग्रजांनाही त्यानी भूलथापा देण्याचा प्रयत्न केला. पण त्याचे ब्रह्मकूट बाहेर काढले या अविवेकी माणसांचा धीक्कार करताना जोतिराव म्हणतात --

मनु धि:कारुनी एकीकडे फेका ।।
माना शूद्रादिका ।। बन्धुपरी ।।
सद्विवेकाविन आर्याजी पाषाण ।।
कलीचे रत्राण ।। जोति म्हणे ।।

मनुस्मृती ग्रंथाची दाद लावा ज्या ग्रंथाने शूद्रावर अमानवी अन्याय करण्यास धर्मपंडितांना प्रेरित केले. त्या धर्मग्रंथाचा व्देष करताना जोतिराव म्हणतात --

बंधू आर्यरावा दयावान व्हाना ।।
जाळून टाकावा ।। मनुग्रंथ ।।

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'मनुस्मृती' जाळून टाकण्याची प्रेरणा या जोतिरावांच्या काव्यातूनच मिळाली. जोतिरावांना सर्व मानवप्राण्यांसाठी एकत्र धर्म निर्माण करावयाचा होता म्हणून ते म्हणतात --

सोडू नका ख्रिस्ती मुसलमान ।।
मांग महारास ।। शूद्रासह ।।
निर्धाराने धरी सद्विवेकास ।।
कित्ता संतानास ।। जोती म्हणे ।।

धर्माच्या नावाने सामान्य लोकांना पिडणाऱ्या आर्यांना जोतिराव दुष्ट-दलाल, खाटीक समजतात अंत्यजांना जोतिराव उपदेश करताना म्हणतात --

अंत्यजानो तुम्ही उपकार स्मरा ।।
पोटी गच्च धरा ।। इंग्लीशास ।।
गोऱ्या लोका याचे सभेमध्ये जावे ।।
हाणून पाडावे ।। ब्रह्मकूट ।।

इंग्रजी राज्यातील तत्वे जोतिरावांना मान्य होती. साक्षरता प्रसाराची मोहिम ख्रिश्चन मिशनऱ्यांव्दारे अखंडपणे इंग्रजांनी चालू ठेवली होती. सामान्यांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण सुधारणा करण्याचे प्रयत्न इंग्रजी राजवटीव्दारे सुरु होते, म्हणून सामान्यजनतेवर इंग्रजी राजवटीचे उपकारच झाले असे जोतिराव म्हणतात. काही सनातनी सुधारकांनी जोतिरावांवर देशद्रोहीपणाचे आणि धर्म बुडवे वृत्तीचे जनक म्हणून शिक्कामोर्तब केले तर कोणी त्यांना म्हसोबाचे भक्त म्हणून संबोधित असत.

जोतिराव फुले शुद्रातिशुद्र बहुजन समाजास आपल्या सत्कार्याथं गो-या लोकांच्या सभेकडे धाव घेण्यास सांगतात. त्यांच्या सत्कार्याने उच्चवर्णीयांचे क्षुद्र कूट चव्हाट्यावर आणण्याचा उपदेश करतात. उच्चवर्णीयांच्या अविवेकी वृत्तीमुळे समाजात स्वैराचार, मोंदूगिरीस ऊत आला होता. धर्मभेदामुळे संघर्षाचे वातावरण निर्माण झाले होते. या सर्व विकृत प्रवृत्तीच्या उच्चाटनासाठी सद्‌विवेकाची नितांत आवश्यकता आहे. त्याशिवाय मानसिक स्वास्थ आणि समाधान लाभणार नाही, म्हणून जोतिराव सर्व जनतेस उपदेश करताना म्हणतात —

सद्‌दविवेकाने तुम्ही करा न्याय ।।
नसे पुढे भय ।। जोति म्हणे ।।

मानवाच्या आचार-संहितेतून त्यांचा सद्‌विवेक जाणवतो. दुष्ट माणसे दुष्कृत्याशी चिकटून असतात. सद्‌विवेकी लोक मात्र आपल्या सद्-वर्तनाने आणि कार्यकुशलतेने चमकतात. आपल्या उद्योगाशी एकनिष्ठ राहून जीवन सफल बनवितात. विवेकी-वृत्तीवर त्यांचा उद्योग अवलंबून असतो. मानवाच्या आयुष्यातील बराचसा काळ वाईट उद्योगाच्या स्वरुपात जातो. जो पर्यन्त मानवी देहात जोम, तारुण्य आहे तोपर्यन्त कार्यदक्ष, उद्योगप्रिय असतो. उत्तरार्धामध्ये मात्र तो आपल्या आयुष्यातील उद्योगाबाबत चिंतन करतो. आपल्या गैर उद्योगाबाबत बरेचजन वृध्दापकाळात हाय-हाय करत बसतात. समाजातील काही अल्प-उद्योगी तर काही आळशी, दुष्ट, दुराचारी असतात. त्यांच्या कर्तव्याची फळे त्यांना 'याची देही याची डोळा' मिळतात म्हणून जोतिराव म्हणतात

जसा ज्यांचा धंदा तशी फळे येती ।।
सुख दुःख होती ।। जोती म्हणे ।।

आळशी माणूस उद्योगापासून परावृत्त होतो. सर्व दुर्गुणाचा ' आळस ' हा पिता आहे. बाळपणापासून हा दुर्गुण प्रत्येकास जडलेला असतो पण त्यास झटकावून टाकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. जर त्या दुर्गुणाने देहात ठाण मांडले तर त्यास तारुण्यात आळसासारखे आणखी काही दुर्गुण जडतात. स्वार्थ, स्वैराचार फसवेगिरी सारखे दुर्गुण त्याचे स्नेही बनतात. वृध्दापकाळी मात्र त्यास खूप त्रास होतो, त्याची

अन्नान-दशा होते, त्याला कधीच सुख मिळत नाही म्हणून जोतिराव म्हणतात --

आळशास सुख कधीच होईना ।।

शांतता पावेना ।। जोति म्हणे ।।

एकेकाळी अगदी गर्भश्रीमंत असणारे पण आळसाने ग्रासलेले लोक अन्नास कसे महाग होतात याचे उदाहरण जोतिराव देतात त्यांना उदरनिर्वाहासाठी पुन्हा वाटेल ते वाईट व्यवसाय करावे लागतात. अर्थात वाईट व्यवसायात पुन्हा त्यांचे नुकसानच होते अखेर त्यांची खूप वाईट अवस्था होते.चोऱ्या दरोडे करतात याबाबत जोतिराव म्हणतात --

आळशाचा धंदा उद्योग काढीती ।।

भिंतीस फोडीती ।। मध्यरात्री ।।

जाईल तितकी चोरी ते करीती ।।

मानव या अवस्थेत पोहचतो म्हणून जोतिराव म्हणतात प्रत्येकाने सत्य उद्योगी बनावे त्यामुळे मानवास कोणत्याही प्रकारची विवंचना लागून रहात नाहीत. मन उल्हसीत बनते.त्यास खूप संपत्ती मिळते,त्यांच्या उद्योगास नियमित यश मिळते, त्यामुळे सर्वांना सुख मिळते.त्याचप्रमाणे जो दीनबंधुच्या सहकार्यार्थ उद्योग करतो, अज्ञानींना विद्या-संपन्न बनवितो आपल्या उद्योगास जपून जो थकल्या भागलेल्यांना सहकार्य करतो त्यास त्याच्या उद्योगात भरघोस यश मिळते म्हणून जोतिराव म्हणतात --

थकल्या भागल्या दीना साह्य करी ।।

उद्योगास सारी ।। जणूनीया ।।

त्याच्या उद्योगास नित्य यश येई ।।

जगा सुख देई ।। जोति म्हणे ।।

मानवाने आपल्या आयुष्यातील जास्तीत जास्त वेळ सत्याचरणासाठी आणि सतकृत्यासाठी खर्च करावा. आपला उद्योग निष्ठेने करण्यातच त्याचे विवेकपण सामावले आहे. सर्व समाजास जोतिराव उद्योगप्रियता व निष्ठेचा उपदेश करतात. कर्तृत्वाप्रमाणे आपले वर्तन, आचरण आणि वैयक्तिक स्वच्छतेची दखल घेण्यास जोतिराव सांगतात .

स्वच्छता महत्व --

मनाची स्वच्छता आणि देहाची स्वच्छता यात खूप फरक आहे. मनाची स्वच्छता मानवाच्या आचरणातून जाणवते तर देहाची स्वच्छता प्रत्येक व्यक्तीस सहजपणे जाणवते. जोतिराव मानवांना सर्वप्रथम आपल्या देहाची स्वच्छता ठेवण्याबाबत उपदेश करतात . या बाबत ते म्हणतात --

स्वच्छ होण्यासाठी स्नान ते करावे ।।
वस्त्रानी पुसावे ।। लागलेच ।।
स्नानाचा कंटाळा ।। पुळ्यांचे माहेर ।।
खरजुंचे घर ।। आदीपीठ ।।
दांत खाऊनिया ।। बोलता चालता ।।
नित्य खाजविता । वेळ जाई ।।

वेळच्यावेळी स्नान केल्यामुळे मनास उल्हास वाटतो, आवडीने उद्योगासाठी मनापासून झटतो.संसर्गजन्य रोग होण्याची शक्यता त्यास नसतेच. दिवसभर त्यास ताजेतवाने वाटते. शिवाय आपल्या देहाची दुर्गंधी येत नाही. धर्मछिद्रेरिकामी होतात. आंघोळीप्रमाणेच आपल्या कपड्याच्या स्वच्छतेची दखल घेणे आवश्यक आहे. धूळ आणि घाम यामुळे देहाचा वेगळाच दर्प येतो यामुळेही त्वचेचे काही रोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही शिवाय नको त्या वेळी आपल्या किळसवाण्या हालचाली सुरु होतात. याबाबत जोतिराव म्हणतात --

अंगवस्त्रे ज्यास धुण्याचा कंटाळा ।।
चोळी वेळोवेळी ।। दोन्ही काखा ।।
दात विचकूनी जांघास चोळी ।।
काढीताच मळी ।। गार वाटे ।।
वस्त्रातील उवा चिमटीने धरी ।।
चोळूनिया मारी ।। मुकाट्याने ।।

जोतिरावांनी अस्वच्छ माणसांचे बारकाईने निरीक्षण करुन त्यांना स्वच्छतेबाबत धडे दिले अशा लोकांबाबत ते म्हणतात --

मनाची स्वच्छता नाही समजला ।।
भूमीभार झाला ।। जोति म्हणे ।।

गृहकार्य-दक्षता --

गृहकार्य-दक्षतेबाबतही जोतिरावांनी समाजाला उपदेश केला आहे, आपली कुवत पाहून खर्च करावा, विनाकारण पैसा खर्च करणे, कर्ज काढणे, हे गृहकार्यदक्ष माणसाचे लक्षण नव्हे. समाजाला लुबाडणारे लोक खूप असतात, त्यांच्यापासून सावध राहून स्वत:चा व आपल्या व्यर्थ खर्च होणाऱ्या संपत्तीचा बचाव करणाऱ्या माणसास खरा गृहकार्यदक्ष म्हणता येईल. चांगल्या माणसांची संगत करुन आपले आचरण व संसार सांभाळणे हे गृहकार्यदक्ष माणसाचेच लक्षण होय. जो गृहकार्य - दक्षतेस विसरला त्यास समाज-कंटक दुष्ट लोक लगेच लुबाडतात म्हणून जोतिराव उपदेश करताना म्हणतात --

सर्वठाई दक्ष असे परिमीत ।।
तोच सुरक्षित जगा माजी ।।

जोतिरावांनी मानव जातीस सांगितलेले हे महान तत्वज्ञानच होय . मानवाच्या सर्वांगीण सुधारणेसाठी आणि प्रगतीसाठी जोतिराव फुले त्यांना उपदेश करतात. गृहकार्य दक्षता, स्वत:ची स्वच्छता या बाबतही सुक्ष्मावलोकन करुन त्यांच्या आरोग्यासंबंधी उपदेश व मार्गदर्शन करतात. यातूनच त्यांची समाजसुधारणेची तळमळ दिसून येते.

## विभाग दुसरा

जोतिरावांनी अखंडाद्वारे संताप्रमाणे परमेश्वर प्राप्तीची तळमळ कधीही प्रकट केली नाही. आत्मनिंदा, पापाचरणाची कबुली व पापमुक्तीसाठी परमेश्वराची विनवणी करणे फुल्यांना मान्य नव्हते. म्हणून ते पूजा-विधीच्या विरोधी होते. ईश्वरपूजा करणे, नैवेद्य, बळी देणे हा धर्म नसून अधर्म आहे असे जोतिराव निक्षून

सांगतात. परमेश्वराबाबतच्या त्यांच्या संकल्पना वेगळ्या होत्या. परमेश्वर सर्वार्थाने परिपूर्ण आहे, त्याला कशाचीही गरज नाही. तो सर्वांचा निर्मिक आहे म्हणून जोतिराव नीर्मिकावर केवळ श्रध्दा ठेवतात. हिंदुधर्मात चाललेल्या मूर्तीपुजेवर ते सडेतोड टीका करतात. हिंदूचे आराध्य दैवत ' गणपती ' यास विद्येचा स्वामीदाता मानले जाते. घरोघरी गणेश-चतुर्थीस त्याची पूजा केली जाते. श्रध्दाळू आणि धर्मांध लोक या उत्सवासाठी हजारो रुपये विनाकारण खर्च करतात.तत्कालीन धर्मपंडितांनी गणपतीसारख्या आराध्य दैवताच्या निर्मितीचा इतिहास कल्पनेनेच रंगविलेला आहे. पशूचे तोंड आणि मानवाचा देह धारण करणारे हे दैवत एक अतिशयोक्तीच वाटते. गणपतीचे रुपवर्णन करताना जोतिराव म्हणतात

'पशूशिरीं सोंड पोर मानवाचे ।। सोंग गणोबाचे ।। नोंद ग्रंथी ।।
बैसे उंदरावरी ठेवूनिया बूड ।। फुकितो शेंबूड ।। सोंडेतून ।।
चिखला तुडवूनी बनविला मो-या ।। केला ढंबुढे-या ।। भाद्रपदी ।।'

— गणेशपूजेच्या निमित्ताने पुरोहितवर्ग दक्षिणेच्या रुपाने खूप द्रव्यलूट करतो केळ प्रसंगी सहकुटुंब यथेच्छ जेवणावर ताव मारुन जातो. या ढंबुढे-याच्या देवाल्यासाठी समाजातील सर्व लोकांकडून वर्गणी वसूल केली जाते पण ज्या शूद्रातिशूद्र , शेतकरी, कामगार यांच्या पैशातून बांधलेल्या देवाल्यात शूद्रांना प्रवेश दिला जात नाही, हा भटशाहीचा शूद्रावरील घोर अन्याय नव्हे काय ? म्हणून संतापाने जोतिराव गणपती या आराध्य दैवतासच म्हणतात--

अंत्यजासी दूर, भटा लाडू देतो ।
नाकाने सोलीतो ।। कांदे गणू ।।

' गणेशोत्सव ' हे शूद्रांना लुबाडण्याचे पुरोहितांचे एक कसबच होय. धर्माच्या नावाखाली उच्च-वर्णीयांनी विविध व्रतवैकल्य, विधि निर्माण करुन समाजाची लयलूट केली. त्यांचा हा स्वार्थ आणि कसब राजरोसपणे चालू होता. या स्वार्थास विरोध करण्याचे सामर्थ्य कुणाकडे नव्हते म्हणून जोतिरावांनी सर्व समाजास त्यांच्या स्वार्थी वृत्तीचे दर्शन घडविले .

<u>ब्राह्मणांचा स्वार्थ आणि कसब --</u>

`ब्राह्मणांचे कसब` या पद्यग्रंथामध्ये जोतिरावांनी ब्राह्मणसमाजाच्या पूर्वेतिहासाबरोबरच तो शूद्रांना कसकसे लुबाडतो याबाबतचे त्यांचे कसब सांगितले आहे. पुरोहित-लोक शूद्रांच्या घरी वास्तूशांती, विवाहासारख्या प्रसंगी जावून मनसोक्त द्रव्यलूट करतात विशेषत: पोथी वाचन, ऋतूशांती, होमहवन, सुर्यचंद्र ग्रहण, सत्यनारायण पूजा विधीया निमित्ताने सर्व शूद्रांना सहज फसवितात. आजही त्यांचे हे `कसब` अखंडपणे सुरु असल्याचे आढळून येते. याबाबत संतापाने जोतिराव त्यांना म्हणतात --

जळो जळो तुमचे जिणे ।।
उद्योग्याआधी ताजे खाणे ।।
हे बा कृत्य लाजिरवाणे ।।
समजोत कपटी शहाणे ।।
स्वकष्टाने पोट भरा ।।
जोति शिकवी फजित खोरा[११]।।

जोतिरावांनी `ब्राह्मणांचे कसब` या पद्य ग्रंथात त्यांच्या स्वार्थी भोंदू - गिरीवर कडाडून हल्ला केलेला आहेच, शिवाय अखंडरचनेतील `आर्य-भट ब्राह्मणांचे कसब` या मध्ये त्याचे दोष सर्व समाजाला दाखवून इंग्रजांनाही जागरुकतेचा इशारा दिला आहे.

आर्य भट ब्राह्मणांनी क्षत्रियांना रणामध्ये जिंकले त्यांना दास बनविले, क्षत्रियांना मत्सराने `क्षुद्र` म्हणू लागले. क्षुद्राचे अपभ्रंशाने शूद्र `झाले. आर्यांनी त्यांना खूप पिडले. विद्येपासून वंचित ठेवले. बलिस्थानातून आलेल्या आर्यांनी कल्पनेने धर्मग्रंथ निर्माण केले. धर्मग्रंथातील तत्वांचा उद्देश शूद्रांना गुलामगिरीतच दीर्घकाळ गुरफटून ठेवणे हा होता. ज्या धर्मपंडितांनी धर्मग्रंथ लिहिले त्यांनी त्यातील तत्वे जनतेसमोर दाखविण्यास अप्रत्यक्षरित्या नकारच दिला म्हणून जोतिराव म्हणतात --

धूर्त भटे मुळी वेद लपविले ।।
पाहू नाही दिले ।। अंत्यजास ।।

त्यांच्या धर्मग्रंथातील आणि वेदातील वर्म जगासमोर आणून द्यावे असा जोतिराव आग्रह करतात. ख्रिस्ती आणि इस्लाम धर्माची तुलना जोतिराव हिंदू-धर्माशी करतात. ख्रिस्ती धर्म पंडित आपले धर्म ग्रंथ सर्व समाजा समोर मांडतात. सर्वांमध्ये बंधुत्वाची भावना जोपासली जाते. सर्वजन निर्मिकाचे पुत्र आहोत अशा भावनेने सुखासमाधानाने जगतात. इस्लामधर्माची तत्वे मानवास खऱ्या अर्थाने मानव म्हणून सामावून घेणारी आहेत. जातिभेद, उच्च-नीचता, वैरभावना कुठेही आढळत नाही. हिंदुधर्माने मात्र जातीयवाद, उच्च-नीचता, रीतीपरंपरा, वृत्त वैकल्ये यामुळे सर्व हिंदु धर्मियांना पोखरले, अखेर शूद्रांच्या दयनीय अवस्थेची दया निर्मिकास आली. त्यांनी भटशाहीचा धिक्कार केला व इंग्रजास राज्यकर्ते म्हणून आणले. तरीही उच्च-वर्णियांची धर्माच्या पडद्याआड गुलामगिरी सुरु होतीच. अशावेळी आपला मानवी हक्क हिरावून घेणाऱ्या आर्यांच्या अधिकारशाहीबाबत जोतिराव म्हणतात--

आर्य कसे धनी ।। शूद्र का हो दास ।।
शोधा कृत्रिमास ।। केले हीच ।।
आता का रे तुम्ही विचार करा ना ।।
धूर्त धिक्कारा ।। जोति म्हणे ।।

उच्चवर्णियांनी गोऱ्या अधिकाऱ्यांना सुध्दा आपल्या कल्पक-बुध्दीने अंकीत ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या राज्यकारभारास आपणच मदत करु शकतो असा विश्वास इंग्रजांमध्ये त्यांनी निर्माण केला. इंग्रजी भाषेचा अभ्यास केला. अर्थात इंग्रजांनी मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या जागी ब्राह्मण-समाजाची नियुक्ती केली. या अधिकारपणाचा त्यांनी गैर वापर करण्यास सुरुवात केली. शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांकडून फंड, शेतसाऱ्याच्या स्वरुपात खूप लुबाडणूक केली पण शेतकऱ्यांच्या मुलांना सुज्ञ साक्षर बनविण्यासाठी त्यांनी कधीही प्रयत्न केला नाही. अनेक उच्चवर्णीय पंतोजीचे काम पहात होते. अर्थातच अध्यापनाच्या चाव्या त्यांच्याकडे होत्या. शूद्रांसाठी हे दरवाजे बंद होते म्हणून इंग्रजांना उद्देशून जोतिराव म्हणतात --

अल्लड इंग्रज भटा जागा देती ।।
पंतोजी करीती ।। गावोगाव ।।
जगद्वेष्टे भट शिक्षक बनती ।।
शूद्रा शिकवती कृष्णलिला ।।

ज्या ठिकाणी स्वार्थ साधता येईल त्या ठिकाणी स्वार्थी ब्राह्मण धाव घेतात. मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा मिळवतात. ज्याप्रमाणे त्यांनी बळीस्थानी येऊन क्षत्रियांना दास बनविले. मांग-महारादिंना जीवन जगणे असह्य केले, त्या प्रमाणे इंग्रजी राजवटीबाबत त्यांचा विश्वासघातकी विचार का असणार नाही? म्हणून जोतिराव इंग्रजांना धोक्याचा इशारा देतात, त्यांच्या दगाबाज वृत्ती बाबत जोतिराव म्हणतात --

मानवी ब्राह्मण बंडखोर होती ।।
काळेपाण्या जाती ।। इंग्रजीत ।।
ब्राह्मणी वकील खोटे स्टँप करी ।।

त्यांची दगाबाजवृत्ती पूर्वापार चालत आलेली आहे. एकेकाळी त्यांनी प्रचंड मोठी कत्तल केलेली होती. स्त्री-पुरुष तान्ह्या अर्भकासह मारल्यानी मोकसले आहेत. युध्दामध्ये क्षत्रियांना जेर केले त्यांना हाकलून दिले, दास बनविले. मांग-महारांना दूर केले अस्पृश्य मानून त्यांना पाणी भरण्यासही बंदी घातली म्हणून संतापाने जोतिराव म्हणतात --

चांडाळ ब्राह्मण, मांगा दूर धरी ।।
स्वत: पाणी भरी ।। आडावर ।।
तान्हेने व्याकुळ जरी मांग मेला ।।
दया ब्राह्मणाला येत नाही ।।

उच्चवर्णीयांच्या निर्दयतेबाबत अनेक उदाहरणे जोतिराव सांगतात. विष्ठा खाणाऱ्या गाईला हे ब्राह्मण ' माता ' मानतात पण अन्न खाणाऱ्या शूद्रांना स्पर्श करणे विटाळ समजतात. यज्ञामध्ये घोड्यांना बळी देऊन घोड्याच्या मांसावर ताव मारतात पण अस्पृश्यांनी आपल्या पोटाची आग थांबविण्यासाठी खाल्लेल्या जनावरांच्या मांसाबाबत जगभर डांगोरा पिटतात. स्वत: सत्यभ्रष्ट असताना शूद्रांना अतिभ्रष्ट समजतात. अनेक प्रकारे त्यांचा छळ करुन अन्नान दशा

केली म्हणून जोतिराव ब्राह्मणांना (कर्मठ पुरोहितांना) विनंती करताना म्हणतात --

शूद्र दासा तुम्ही विद्या बंद केली ।।
ध्या ना ती साऊली ।। अत्यंजांची ।।

धर्म तत्वाच्या नावाखाली आज-पर्यन्त उच्चवर्णीयांनी शूद्रांना पिडले. निदान तो धर्म तरी जग-जाहिर करा असे जोतिराव त्यांना सांगतात --

ज्या इंग्रजांनी त्यांना आश्रय दिला त्यांची निंदा हा समाज राजरोसपणे करताना आढळतो. वास्तविक ब्राह्मण समाजावर इंग्रजांचे तसे उपकारच आहेत. कारण स्वार्थी, कपटी वृत्ती अंगी असणाऱ्या या वर्गांना त्यांनी मोठमोठ्या पदांच्या जागा दिल्या होत्या, तरीही इंग्रजाशी दुष्ट भावनेने वागणाऱ्या ब्राह्मणांना जोतिराव म्हणतात --

ब्राह्मणांनो तुम्ही कृतघ्न का होता ।।
इंग्रजा निंदीता ।। जोति म्हणे ।।

ब्राह्मणसमाजाच्या चक्रव्यूहात निदान इंग्रजांनी तरी सापडू नये म्हणून जोतिराव इंग्रजांना जागरुकतेचा इशारा देतात. धर्मांच्या नावाखाली लुबाडणाऱ्या ब्राह्मणांचे गुल फोडण्यासाठी जोतिराव इंग्रजांना म्हणतात --

इंग्रजांनो तुम्ही बसू नका उगे ।।
ब्रॅाडलास वेगे ।। आणा येथे ।।
त्याचे कान धरा दावा दुष्ट वेद
आर्याजींचा मद ।। शूद्र छळ ।।

धर्मांच्या नावाखाली सर्व समाजाच्या डोळ्यात त्यांनी धूळ फेकली. आपल्या उत्पत्तीबाबत सुध्दा ते बेडरपणे थापा मारतात. एकेकाळी असणारे न्यायदाते, शास्त्रकर्ते, गुरु इ. ब्राह्मणच होते पण त्यानी सर्व समाजास खूपच पिडले म्हणून सर्व ब्राह्मणेत्तरांना जोतिराव म्हणतात --

ब्राह्मणेत्तरांनों विचारासी करा ।।
अभिमान धरा ।। मानवाचा ।।
ह्यांची उत्पत्ती सह्याद्री खिंडी ।।
वर्णिली अखंडी ।। जोति म्हणे ।।

सह्याद्रीखंडातून आलेली ही आर्यांची टोळी एक प्रकारची भटकी जमात म्हणणे गैर होणार नाही. या जमातीच्या सत्याचरणाचे ' सत्यपाठ ' जोतिरावांनी सांगितले आहेत.

सत्यपाठ --

जोतिरावांनी पुरोहितशाहीच्या दुष्कृत्याचे ' सत्यपाठ ' अखंड रचनेत समाविष्ट केले आहेत. त्यांच्या व्यभिचाराने सर्व समाजात असंतोष माजला होता. पण इंग्रजी सत्तेपुढे शूद्रांचे शहाणपण चालत नव्हते. ब्राह्मण लोक बऱ्याच वेळा इंग्रजांची निंदा करीत असत, प्रसंगपरत्वे त्यांच्याशी एक निष्ठेने वागत असत, मांस-मच्छर वर्ज मानणाऱ्या ब्राह्मण समाजाने इंग्रजांच्या आग्रहाखातर मांस-मद्य स्वीकारणे आणि तरीही सोवळ्या-ओवळ्याचे, पावित्र्याचे पांघरुण परिधान करणे हा त्यांच्या आचरणातील एक सत्यपाठच होय. न्यायदानाचे कार्य त्यांच्याकडे होते. नि:पक्ष - पातीपणे न्यायदान करणे त्यांच्यादृष्टीने पाप होते. शिवाय यामुळे लाच खाता येणार नाही म्हणून मिळेल तेवढी लाच खाऊन, अयोग्य, मन मानेल तसा न्याय देऊन अन्यायी पक्षास ते पाठबळ देत असत. समाजा-समोर पावित्र्याच्या, विवेकीपणाच्या संकल्पना मांडताना पण हे पावित्र्याचे पुतळे अनेक प्रकारच्या अनैतिक संबंधात गुरफटलेले असतात. याबाबत जोतिराव म्हणतात---

यवनीचे मुख मोजेने चोरिती ।।
म्हारास म्हणती ।। नीच बेटे ।।
असे जगद्वेष्टे आर्यांस म्हणावे ।।
समूळ त्यागावे ।। जोति म्हणे ।।

उच्चवर्णीय म्हणजे जणू दुर्गुणांची खाणच होय असे म्हणून जोतिराव त्यांच्या इतर घटनांचे सूक्ष्मावलोकन करुन त्यांचा ' सत्यपाठ ' समाजासमोर मांडतात. भक्तांचे रुप घेऊन हे कर्मठ लोक मोठमोठ्याने ईश्वरनाम महिमा गातात. भजनामध्ये शूद्रांना मुग्ध करुन घेतात. उपदेशाचे डोस पाजतात, पंढरपूर सारख्या तीर्थांच्या ठिकाणी नंगानाच करतात या त्यांच्या भोंदूगिरीबाबत जोतिराव म्हणतात --

विठ्ठलाची मुर्ती ध्यानी मनी धरी ।।
गाता ताल धरी ।। नाच्यापरी ।।
निर्लज्य होऊनी फुगड्या खेळतो ।।
पक्वान्न घालीतो ।। स्त्रियासंगे ।।
सुखरुप होशी ।। उपदेश करी ।।
वेडा वारकरी जोति म्हणे

पण या मोंदू वारकऱ्यांच्या व भटजींच्या संग अत्यंत हाणीकारक व विश्वासघातकी आहे असे सांगून जोतिराव सामान्यांना सावधानतेचा इशारा देतात सर्वांनाच मूलथापा देऊन उपदेशाचे धिंगाणे घालून आर्यभट मजेत राहिले.समाजावर आपल्या मोंदूगिरीचा काय परिणाम होतो याचा त्यांनी विचार देखिल केला नाही. इंग्रजराज्यकर्त्यांनी सुध्दा याचा विचार केला नाही. राजा आपल्या प्रजेचा विचार करत नाही त्यास राजा म्हणणे कितपत इष्ट आहे असे मत मांडून जोतिराव इंग्रज राज्यकर्त्यांना दोष देतात. त्यांनी शूद्रांना माणूसकीचे वर्तन दिले पाहिजे.त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी झटले पाहिजे अशी जोतिरावांची अपेक्षा आहे.

पिढ्यांन-पिढ्यांच्या गुलामगिरीत असणाऱ्या शूद्रांच्या मुक्ततेसाठी जोतिराव व त्यांचे अनुयायी सदैव झटत होते. पण सर्वांना तुच्छ मानणाऱ्या आर्य-भटांनी त्यांना दाद दिली नाही. जोतिरावांनी मात्र उच्च-वर्णीयांचे दुष्टाचरण सत्य पाठांच्या रुपाने समाजा समोर मांडले .भटाच्या वाणीचे त्यानी सूक्ष्मावलोकन केले त्यातून त्यांचा स्वार्थ,स्वैराचार,मोंदूगिरी सामान्य जनते समोर मांडलीआहे.

## भटांचे नैतिक अधिष्ठान --

आपली नियोजित वेशभूषा धारण करुन स्वार्थापोटी समाजात संचार करणाऱ्या भटमंडळीवर जोतिराव कडाडून हल्ला करतात. सर्व प्रथम त्यांच्या स्वार्थी वृत्तीवर व आचरणावर प्रकाश टाकतात. समाजामध्ये पाच दहा ब्राह्मण उपाध्ये-भटांचा गट जमून सर्वसामान्याकडून द्रव्यलुट करतात. स्वत:स पवित्र मानून पावित्र्याचे धडे इतरांना देतात. पोथी-पुराणे वाचून दक्षिणेसाठी हात पुढे करतात.तत्पूर्वी

जेवणावर ताव मारलेला असतोच पण हट्टाने मन मानेल तेवढी दक्षिणा मागून ती मिळवताच आपले अंगुष्ठ धुतलेल्या पाण्याला तीर्थ मानून शूद्रांना पिण्यास देतात, आणि दक्षिणा उपटतात. हा भट ब्राह्मणाचा तांडा 'मेरी तुंबडी भर दे, मेरी तुमडी भर दे' करीत येतो. मिळालेली दक्षिणा घेवून पवित्र तीर्थक्षेत्र किंवा देवाल्या- ऐवजी एखाद्या रंगमहालात जातात. तेथील त्यांच्या चाळ्याबाबत जोतिराव म्हणतात --

भेटती मैना पोपट ।। जेव्हा जमती गटपट ।।
बिस्क बी बे झटपट ।। चुमण घेती मटमट ।।
मेरी तुंबडी भर दे ।।

सर्व सामान्य शूद्रातिशूद्रांना लुबाडून त्यांची मौजमजा चाललेली असते. वेगळ्या केशभूषेमुळे त्याचे रुप एखाद्या माजलेल्या बोकडाप्रमाणे दिसते. शूद्राघरी जाऊन हातात जपमाळ घेवून त्यांना लुबाडण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. एखादा पाठ असणारा श्लोक सतत बडबडत असतो पण त्यांचे लक्ष भलतीकडेच असते अशा नीतीभ्रष्ट भटाबाबत जोतिराव म्हणतात --

घ्या हिरावून जपमाळ ।। भडवे रात्रंदिन शयनी ।।
करीती बडबड भारी ।। मेरी तुंबडी भर दे ।।

इंग्रजानी त्यांना मोठमोठ्या हुद्यांच्या जागा दिल्यामुळे त्यांच्याकडे खूप धनसंचय आहे शिवाय काही जण आपल्या धनसंचयाच्या आधारे व्यापार करतात. ब्राह्मण समाजातील जास्तीत जास्त अम्मलदार, शिरस्तेदार, सावकार, फौजदार असल्याचे आढळते. म्हणून जोतिराव इंग्रज सरकारचा 'आंधळे सरकार' म्हणून उल्लेख करतात. इंग्रजानी त्यांना हाताशी धरले होते. अर्थात हे धूर्त इंग्रजांच्या इच्छेप्रमाणे वागत होते.

ब्राह्मण समाजाचा स्वार्थीपणा सर्वांना ज्ञात होता. स्वार्थी उद्देशाने लुबाडणूक कराव्यास येणाऱ्या भटतांड्यास पाहून त्याचा शिवराळ भाषेत तिरस्कार करताना जोतिराव म्हणतात --

अरे, त्याला नेऊनी जाळा ।। अरे त्याला नेऊनी जाळा ।।
अहो शूद्रांचा काळ। आले ब्राह्मण चांडाळ ।।

जोतिराव परखड भोषत त्याचा तिरस्कार करतात पण त्यांना हा तिरस्कार सुध्दा फुलांपेक्षा सुकुमार वाटत असावा म्हणून त्यांच्या वर्तनात बदल होत नाही.

जोतिराव भटांची कुनीती उघडी पाडतात. प्रत्यक्ष त्यांचे आचरण जनतेसमोर मांडतात. हे ब्राह्मण शेतसारा घेतात, दक्षिणा उपटतात, कार्यालयात लाच खातात, मांग म्हारांना भ्रष्ट म्हणतात आणि यवनी रंभाशी चाळे करतात, वेश्यांचे चुंबन घेतात, अर्भकांचा वध करतात, मांस-मच्छर खातात, तरुण मुलींची छेड काढतात, अनेक स्त्रियांचे पतीत्व भूषवितात, विधवा स्त्रियांची विटंबना करून सती जाण्यास भाग पाडतात. स्वत: मात्र अनेक विवाह करतात. अशाप्रकारे असत्याचा व कुनीतीचा डोंगर त्यांच्या डोक्यावर असतो. म्हणून जोतिराव म्हणतात--

ज्याला नाही सत्यनीती ।। त्याला कैवी बंधू प्रिती ।।

तो शुद्रांशी बंधूत्वांच्या नात्याने वागू शकणार नाही म्हणून जोतिराव म्हणतात --

जाळ तुझी फुकी एकी ।। धूर्तनटी अर्ध मुखी ।।
तुम्ही आर्य कार्य साधू ।। नव्हत शुद्रांचे हो बंधू ।।

त्यांच्या तोंडून ऐक्यासंबंधी बाष्कळ बडबड ऐकण्यात काय अर्थ आहे. त्यांच्या रोमारोमात स्वार्थ भिणलेला आहे. लोकांच्या मनात अंध:श्रध्दा निर्माण करण्यासाठी, काल्पनिक कथांच्या स्वरुपात धर्मग्रंथ लिहिले . या ग्रंथात त्यांनी ब्रह्मदेवाची उत्पत्ती शेषशाईच्या बेंबीतून उगवलेल्या कमळातून झाली असे लिहिले आहे. म्हणजे आपली उत्पत्ती मानवा पेक्षा वेगळी अयोनी संभव असून आपण पृथ्वीवरील भूदेव असल्याचा ते बहाणा करतात. हे सर्व उल्लेख त्यांनी हेतुपुरस्सर धर्म ग्रंथात केले व स्वत:चे महात्म्य सर्वांना सांगण्याचा प्रयत्न केला. उच्चवर्णीयांतील काही लोक स्वत:स गुरु संबोधतात. गुरु म्हणजे साक्षात परमेश्वर समजतात पण गुरु हा शब्दच एक ' ढोंग ' आहे. मानवास सत्याचरण व जीवन मार्गदर्शनाचे कार्य गुरु करीत असतो असे मानतात पण जे लोक स्वत:स गुरु संबोधितात त्यांनाच जोतिराव प्रश्न करतात---

मानवात गुरु मूळ कोण झाला ।।
प्रश्न गुरुजीला ।। जोति म्हणे ।।

स्वत:स गुरु संबोधून समाजात संचार करणाऱ्या व आपला शिष्यपरिवार वाढविणाऱ्या ढोंगी गुरुचा स्वार्थ जोतिरावांनी अचूक शोधून काढला. उच्चवर्णीयांनी अनेक पध्दतीने समाजास, शूद्रांना लुबाडले त्यातीलच हा एक प्रकार असावा. स्वत: महा ज्ञानी गुरु असल्याचा बहाणा करुन समाजास लुबाडण्याची उच्चवर्णीयांची ही युक्ती होय. ईश्वराने ज्या मानव-प्राण्यांना निर्माण केले त्या निर्मिकालाच गुरु मानण्यात काय गैर होईल ? असे जोतिराव फुले मत मांडतात कारण ईश्वराने ( निर्मिकाने ) मानवास पंचज्ञानेंद्रिये देऊन सर्व जगाचे ज्ञान करवून दिले. इतर प्राणीमात्रांपेक्षा मानवास निर्मिकाने बुध्दि-सामर्थ्य दिले, त्या आधारे तो सद्विचाराचे मंथन करुन सत्याचरण करु शकतो. बुध्दि-सामर्थ्या बरोबरच डोळे, कान, नाक, त्वचा, जीभ ही पंचेंद्रिये दिली. मानवाने या पंचेंद्रियावर ताबा मिळवून विवेकीवृत्तीने वागावे हा निर्मिकाचा उद्देश असावा पण मानव पंचेंद्रियावर ताबा न ठेवता त्याचा गैरवापर करु लागले. भोंदू गुरु तर शिष्यांना ज्ञानाचे डोस देताना सांगतात की आपल्या देहातच ईश्वर आहे. त्याच्या शोधासाठी यम नियमाचा मार्ग दाखवितात. जर मानवी देहात निर्मिक असल्यास कोणत्या गुरुस निर्मिकाने दर्शन दिले आहे ? असा रोख ठोक सवाल जोतिराव करतात. ढोंगी गुरुबाबत जोतिराव म्हणतात --

वेश्यापरी सर्व गुरु बरळती ।।
दावीन म्हणती ।। निर्मिकास ।।
कोणत्या गुरुने निर्मिका पाहिला ।।
दावीना आम्हाला ।। प्रत्यक्ष तो ।।
सर्व गुरु हीरे मैदानी आणावे ।।
तपासून घ्यावे ।। जोति म्हणे ।।

गुरु परमेश्वराचे अवतार असतील तर गुरुस्थानी मानल्या गेलेल्या येशूख्रिस्त, प्रभुरामचंद्र, श्रीकृष्णादिंनी केलेल्या संहाराचा उल्लेख करताच गुरुस्तोम माजवणारे लोक खाली माना घालतील पण संधी मिळताच पुन्हा ताठ मानेने देहातील आत्म्याचे स्वरुप पटवून सांगण्याचा प्रयत्न करतात. पण प्रत्यक्ष आत्मा काय चीज आहे हे त्यांनी तरी कुठे पाहिलेले असते ? म्हणून जोतिराव या ढोंग्यांचा धिक्कार करतात. फसवेगिरी आणि उपद्रव करणे हे त्यांचे व्रतच होय. ते मद्य-भांग पिऊन घरच्यांना

त्रास देतात. जन्म देणाऱ्या मातेची हेळसांड करतात. अखेर ते अनेक विकारानी ग्रासले जातात. त्यांचा देह म्हणजे दुर्गणांचे आगार बनते अशा नरकरुपी देहात ईश्वर कसा थांबणार ? ' लोका सांगे ब्रह्मज्ञान । आपण कोरडे पाषाण ' या तत्वाप्रमाणे त्यांचे आचरण असते. आदर्श घेण्यासारखे त्यांच्याकडे काहीच नसते. उपदेश करण्यासारखी त्यांच्याकडे ज्ञानसंपन्नताही नसते मग हे अल्पज्ञानी गुरु काय उपदेश करणार आहेत ? असा प्रश्न जोतिरावांसमोर उभा राहतो. अल्पज्ञानी, असत्याचरणी भोंदू गुरुवर जोतिराव टीका करुन सत्याचरणाबाबत उपदेश करतात.

मठशाहीचे असत्याचरण --

' स्त्री ' समाजातील महानशक्ती आहे, ती मानवाची जन्मदात्री असून मानवाच्या उत्पत्तीचे व्रत तिने अखंडपणे स्वीकारलेले आहे. ब्राह्मणसमाज यास अपवाद ठरु शकत नाही. मात्र या उच्चवर्णीयांनी जन्म देणाऱ्या मातृदेवतेचे ऋण विसरुन ते सर्व ब्रह्मास दिले. आपली उत्पत्ती ब्रह्मदेवाच्या तोंडून झाल्याचे जाहीर केले. यातूनच त्यांची सत्यता पटते. समाजातील त्यांचे आचरण उच्चवर्णीयांना अशोभनीय असल्याचे जाणवते. जोतिरावांनी ' ब्राह्मणांचा भोंदूपणा ' व ' शूद्रापासून फंड गोळा करण्याविषयी निषेधार्थक ' या अखंडातून पुरोहित-शाहीच्या असत्याचरणावर प्रकाश टाकला आहे.

पुरोहितशाहीने समाजात स्वार्थ, भोंदूगिरी, भूलथापा, धर्मांधता या रुपाने सर्वांना लुबाडण्याचा जणू चंगच बांधला होता. स्वत:स भूदेव मानून सर्वांवर गुलामगिरी लादली होती पण सामान्यांची सहनशीलता संपली होती. जोतिराव, लोकहितवादी या सारखे समाजसुधारक सर्व जनतेला त्यांचा भोंदूपणा स्वार्थ नजरेला आणून देण्याचे कार्य करीत होते. तरीही त्यांच्या वृत्तीमध्ये बदल होत नव्हता , शेवटी सर्व जनतेला उपदेश करताना जोतिराव म्हणतात ---

जोति सांगे ब्रह्मचोंडा समूळ त्यागावे ।।
पोटापुरता धंदा सारुन सत्या आळवावे ।।

विशेषत: काबाडकष्ट करणाऱ्या मजूर शेतकरी सारख्यांना लुबाडून, मिष्टान्न खाऊन मऊ बिछान्यावर लोळणाऱ्या मठाबाबत जोतिरावांच्या मनात मनस्वी

संताप खदखदत होता. गो-या अधिका-यांची मर्जी संपादून शूद्रापासून फंड गोळा करण्याचे त्यांनी सत्र आरंभिले --

' शूद्रांपासून फंड गोळा करण्याविषयी निषेधार्थक '

समाजात साक्षरता मोहीम इंग्रज व ख्रिश्चन मिशनरी यांनी सुरु केली होती. भट लोक इंग्रजांचे बगलबच्चे होते. त्यांनी या मोहिमेबाबत काही सूचना इंग्रजांना दिल्या. सामान्य लोकांपासून शूद्राकडून फंड गोळा करुन शाळा स्थापन करण्याचे सत्र सुरु केले त्या त्या शाळामध्ये असणारे 'पंतोजी ' प्रामुख्याने ब्राह्मणच होते. शूद्रांपासून शाळा उघडणेबाबत फंड गोळा करुन ब्राह्मण लोक प्रत्यक्ष शूद्रांच्या मुलांना शाळेत प्रवेश देत नसत. त्यांना अपमानित वर्तन देत असत पण शूद्र मात्र मूग गिळून गप्प बसत म्हणून जोतिराव शूद्रांना म्हणतात --

इंग्रजास तुम्ही करा आधी जागे ।।
फंड लागे मागे जोति म्हणे ।।

शूद्रांपासून फंड गोळा करणे हेच मुळी अन्यायकारक आहे पण हा अन्याय आणि जुलूम अखंडपणे सुरु होता. शूद्रांना अज्ञानी ठेवण्याचा उद्देश भटांचा असल्याने त्यांच्या मुलांचा हे भट पंतोनी नेहमी तिरस्कार करीत व भटांच्या मुलांचे कौतुक करीत हा पक्षपात नेहमी होत होता या बाबत जोतिराव म्हणतात--

आर्य परिक्षक पक्षपाती होती ।।
भट पोरा देती गुण जास्त ।।
शूद्रपोरावर डोळे वटारीती ।।
धाबरे करीती ।। परिक्षेत ।।

हा पक्षपात झाल्याने अर्थातच शूद्रांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागे. म्हणून जोतिराव इंग्रज सरकारला अवाहन करतात. सरकारी शाळा स्थापन करुन प्रथम शूद्रांना प्रवेश द्यावा ही त्यांची कळकळीची विनवणी आहे. शिक्षणाच्या संदर्भात त्यांनी हंटर शिक्षण अयोगापुढे ( १९ ऑक्टोबर १८८२ रोजी ) आपले निवेदनही सादर केलेले होते. त्या व्दारे तत्कालिन शिक्षणपध्दतीमधील दोष दाखवून सुधारणा सुचविल्या याबाबत इंग्रजांना जोतिराव म्हणतात --

सरकारी शाळा आदीदिवे लावा ।।
उजेड दाखवा ।। शद्रांदिका ।।
फंड नको तुम्हा कोणाची मदत ।।
दावा करामत शद्रलोका ।।

शेतक-यांकडून इंग्रज लोक सलग ४० वर्षे लोकल फंड गोळा करीत होते. मुंबई इलाख्यातील शेतकरी लोक इंग्रज सरकारास दरसाल २० लाख रुपयावर लोकल फंडाची रक्कम देत आलेले आहेत.[१२] शेतात धान्य पिको वा न पिको पण सरकारचा फंड मात्र दिलाच पाहिजे असा दंडक होता. स्त्री-शद्रादि शेतकरी कुटुंबातील मुलांना मात्र या फंडापासून कोणताही मोबदला मिळत नव्हता म्हणून मालेराव म्हणतात --

लोकलफंड देत आलो कानू कायदा ।।
सोसून ।। गुरे-ढोरे-घरे-दारे वेतन वस्तू विकून ।।

फंड गोळा करुन स्वार्थ साधत होते पण कनिष्ठ वर्गाच्या सुधारणेसाठी व साक्षरताप्रसारासाठी काहीच केले नाही. उच्चवर्णीयांच्या या लुटारु वृत्तीचा जोतिराव जाहिरपणे निषेध करतात व दस्यूंच्या जीवनाकडे वळतात. दस्यूंचा करुणारम्य पोवाडा त्यानी लिहून समाजासमोर दस्यूंच्या व्यथा वेदना मांडल्या --

दस्यूचा पोवाडा --

शाहिरी वाङ्मयाचा प्रभाव जोतिरावांच्या काव्यावर झाला. ' छ. शिवाजीराजे भोसले ' यांचा पोवाडा त्यांनी प्रसिध्द केलाच शिवाय दास्यांची शोकांतिका सांगणारा ' दस्यूचा पोवाडा ' लिहिला. पोवाडा लिहिणा-या शाहिरांना रामदास ' दासबोधात ' धीट कवी म्हणतात तर महिपतीबोवा ' धीट कवी तो शाहीरमत ' अशी व्याख्या करतात.[१३] यावरुन जोतिरावांना धीट कवी किंवा शाहीर मत म्हणणे वावगे ठरणार नाही. वीर पुरुषाच्या कर्तृत्वाचे, पराक्रमाचे वर्णन पोवाड्यामध्ये केले जाते असे, १७ व्या शतकातील शाहिरी वाङ्मयास लिखित स्वरुप नव्हते. १९व्या शतकाच्या उत्तरार्धास मात्र या काव्यप्रकारास लिखित स्वरुप प्राप्त झाले.

' पोवाडा ' या काव्यप्रकाराव्दारे समाज जागृतीचे कार्य प्रखरतेने आणि प्रभावीपणे होऊ शकत होते. शिवाय त्याचा ऐतिहासिक पुरावा अथवा ऐतिहासिक साधन म्हणून उपयोग केला जात असे. समाजात तळागाळापासून नवक्रांती निर्माण करण्याचे सामर्थ्य पोवाड्यात होते म्हणूनच जोतिरावांनी आपल्या अखंड रचनेमध्ये पोवाड्याचाही समावेश केला. या वाङ्मय प्रकाराचे महत्व विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी ओळखले होते. त्यांच्यापासून श्री. शालीग्राम यांना स्फूर्ती मिळाली. पेशवाईवर त्यांनी खूप पोवाडे लिहिले.त्याचप्रमाणे तुळशीदासांनी लिहिलेला तानाजीचा पंचावन्न चौकी पोवाडा, सगनभाऊंचा पाणिपतचा पोवाडा वाचकांना प्रेरणा देणारा ठरतो. जोतिरावाचा छत्रपति शिवाजीराजेंचा पोवाडा वाचकासमोर शिवकाल चित्रित करतो पण दस्यूचा पोवाडा मात्र वेगळा घाट आणि विषय घेऊन वाचकांसमोर अवतरतो. ही बहुजन समाजाची एक शोकांतिका आहे.इराणातून आलेल्या आर्यांनी बलिस्थानातील क्षत्रियांना पराभूत करुन आपले दास बनविले.या दासांची करुणा दस्यूचा पोवाडामध्ये गायली --

बलिस्थानातील हे क्षेत्रपती प्रेमळ पण पराक्रमी होते. कपटी भावना त्यांच्यामध्ये कधीही निर्माण झालेली नव्हती. शत्रूबाबतही त्यांच्या मनात आदर होता. त्याचप्रमाणे त्यांच्यावर दबावही होता. सध्यामात्र क्षेत्रपतीवर पराधीनत्वाची वेळ आली आहे. याबाबत जोतिराव दु:खाने त्यांना म्हणतात --

तुम्ही मुळचे क्षेत्रपती ।।
झाली कोण गती ।।
तोलुनी पाही ।।

क्षत्रियांना आर्यांनी गुलाम बनविले. मनुस्मृतीसारखे ग्रंथ निर्माण करुन शुद्रांनी कसे वागावे याबाबतची आचारसंहिता निर्माण केली. मांग-महारादिंना खूप पिडले. शुद्रादिंना दु:खाच्या खायीत लोटून त्यांची अन्नान दशा केली. धर्माच्या नावाने मर्द क्षत्रियांना तीर्थ म्हणून घाणेरडे पाणी देऊ लागले. धर्मांधतेमध्ये डुंबलेल्या जोतिरावांच्या मनात तिरस्कार आहे.याबाबत ते म्हणतात --

तुम्ही कुलदीपक कसे, निपजले जसे पद्मी रानात ।।
जगाने काय वर्णावे ,कवींनी गावे गुण चौघात ।।

मराठ मोठेपणाचा टेंभा कशाला मिरवता,घरी स्त्रियांना अंगभर वस्त्र मिळत नाही. आर्यांनी सर्वांना मूर्ख संबोधून दास बनविले पण अद्याप शूद्रांना जाण कशी येत नाही ? त्यांच्यामध्ये क्रांती का निर्माण होत नाही ? त्यांना स्वत्वाची जाणीव करुन देताना जोतिराव म्हणतात --

विद्येचा अव्हेर कराल, देशोधडीला जाल,डाग वंशात ।।
लाविता किर्तीध्वजा,उडविली मजा,आर्य पिंजऱ्यात ।।

आर्यांच्या हुकूमशाहीतून मुक्त होणे अवघड नाही किंबहुना त्यांना पिंजऱ्यात ठेवणेही अवघड नाही पण त्यांच्यात नवक्रांती का निर्माण होत नाही याबाबत जोतिरावांच्या मनात खंत होती.

धर्मांधतेमुळे अनेक पराक्रमी लोक सर्वस्व हरवून बसले, शिंदे होळकरांचीसुध्दा त्यातून सुटका झाली नाही. इंग्रजांनी मात्र आर्यांचे गूढ बाहेर पाडले.याबाबत जोतिराव म्हणतात---

इंग्लिशे उघडे पाडिले गुढ आते वेदामधून ।।
वेदमताचे केले खंडण, सद्धर्म मंडण निके स्थापून ।।

त्यामुळे आर्यांची मती खुंटली.इंग्रजांना ते खूप धाबरू लागले पण भटांची कारस्थाने अद्याप चालूच आहेत. धर्माच्या नावाखाली सामान्य समाजाची लुबाडणूक चालूच आहे. दस्यूंच्या पोवाड्याव्दारे जोतिरावांनी सर्व शूद्रादिंना स्वत्वाची जाणीव करुन दास्यमुक्त होण्याबाबत प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला.

## विभाग तिसरा

### समाज जागृती प्रेरणा --

जोतिराव फुले यांनी हिंदुधर्मातील तत्वप्रणाली व पार्श्वभूमीचे सुक्ष्मावलोकन करुन त्यातील गुह्य ,कपटी कारस्थान जनतेसमोर मांडण्याचा प्रयत्न केला.शूद्रांना धर्मांध बनवून पिढ्यानपिढ्याचे गुलाम बनवले होते. तत्कालीन राजकीय परिस्थितीचा विचार करता या अन्यायास वाचा फोडण्याचे सामर्थ्य कुणाकडे नव्हते.जोतिरावांनी

बहुजन शूद्र समाजास दास्यमुक्त करण्याचा निर्धारच केला होता.ब्राह्मणांचे कारस्थान उलथून पाडण्याचे त्यांनी ठरविले त्यासाठी त्यांनी इस्लाम,बौध्द, ख्रिस्ती, जैन, इत्यादी धर्मतत्वाची चिकित्सा करुन सर्वधर्मसमभाव प्रस्थापित करणारा 'सत्यधर्म' स्थापन केला. वास्तविक हे हिंदुधर्माचे एक प्रकारचे आधुनिकीकरण म्हणावे लागेल.

ब्राह्मणेतरांच्या चळवळीमुळे पुरोहितवर्ग थोड्या प्रमाणात भयभित झाला असावा. विविध माध्यमाव्दारे जोतिरावांनी गुलामगिरीत चाचपडणाऱ्या समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधकांचा संचार सर्व महाराष्ट्रभर सुरु झाला. त्याची ही प्रचार मोहिम रात्रंदिवस चाले.प्रामुख्याने रात्रीचे वेळी 'लावण्या' व 'जलशाच्या' माध्यमाने सत्यशोधक सामान्य शूद्रांना उपदेश करीत होता.ब्राह्मण समाजावर टीकाही केली जात होती. विशिष्ट जातीवाचक टीका असल्याने सोलापूरच्या डि.मॅजिस्ट्रेट मे.मरुचासो यांनी सत्यशोधकांना जलशा करण्यासाठी दिलेली परवानगी रद्द केल्याची उदाहरणे आढळतात. याबाबत सोलापूरचे 'कल्पतरु' पत्राने सत्यशोधकांचा जलशा' या मथळ्याखाली दिला आहे.[१४] तरीही सत्यशोधक आपले कार्य खंडीत करत नव्हते. जोतिरावांनी पद्यरचनेच्या माध्यमाने सामान्यापर्यन्त सार्वजनिक सत्यधर्म पोहोचविलाच, शिवाय बळीराजासारख्या आपल्या महान पूर्वजांचा इतिहास व आदर्श प्रशासन जनतेसमोर मांडले.

प्रजाहित दक्ष बळीराजा --

बलिस्थानातील' बळी ' हा एक पराक्रमी राजा होता. इराणमधून आलेल्या आर्यांनी कछ,मछ,वराह,नृसिंह इत्यादी रुपे धारण करुन आपली जुलूमी परंपरा कायम चालू ठेवली होती. बळीराजाचे पणजोबा हिरण्यकश्यपूस नृसिंहाने विश्वास - घाताने ठार केले.विश्रांतीच्या इराध्याने पलंगावर पहुडलेल्या हिरण्यकश्यपूवर लपून बसलेल्या नृसिंहाने झडप मारली आणि आपल्या हातातील वाघनख्यांनी हिरण्य- कश्यपूचे पोट फाडून वध केला.[१५] स्वसंरक्षणार्थ नृसिंहाने आपल्या बांधवासह पलायन केले. त्यापासून ब्राह्मणांना ' द्विज ' म्हणण्याऐवजी पिढा देणारे ' विप्र ' म्हणू लागले. विप्रांच्या या अघोरे कृत्यावर पांघरुण घालण्याच्या उद्देशाने कालांतराने त्यांचा जन्म खांबातून झाला यासारख्या नाना तऱ्हेच्या लबाड्या जनतेवर बिंबवल्या.आपले अघोर कृत्य लपवण्याचे ' कसब ' तत्कालीन

विप्र-समाजाकडे असल्याचे जाणवते.

हिरण्यकश्यपूच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा 'भक्त प्रल्हाद' व त्याच्या नंतर 'विरोचन' यांनाही फसविण्याचा प्रयत्न केला पण विप्रांवर काडीमात्र विश्वास न ठेवता राज्यकारभार व्यवस्थित चालवला. विरोचनाचा पुत्र 'बळी' खूप पराक्रमी होता. बळीराजाच्या कारकिर्दीत सर्वत्र सुख समाधान नांदत होते. त्याच्या राज्याचा विस्तारही खूप मोठा होता. यामध्ये सिंव्हलद्वीपाचे आसपास असणारी कित्येक 'बेटे' कोंकण माळ प्रांतातील काही भाग व महाराष्ट्रासारख्या विस्तारित भागाचाही समावेश होता. बळीराजाने सुयोग्य व्यवस्थापनासाठी आपल्या राज्याचे ठराविक भाग ( क्षेत्र ) करुन देखरेखीसाठी क्षेत्रपतींची नियुक्ती केली. महाराष्ट्रासारख्या मोठ्या क्षेत्राची नऊ खंडामध्ये विभागणी केली. प्रत्येक खंडाच्या अधिकाऱ्याचे नाव 'खंडोबा' ठेवले अयोध्ये जवळ बळीराजाचे काही क्षेत्र होते ते दहावे खंड होय. त्या खंड प्रमुखाचे नाव 'काळभैरी' होते. महाराष्ट्रातील नऊ खंडाचे वसूलीसाठी 'महासुभा' व न्यायदानासाठी एक न्यायी असे दोन अधिकारी नियुक्त केले. न्यायदान व वसुलीचे कामकाज सुव्यवस्थित चालत असे हा नऊ खंडाचा महासुभा पिकपाण्याची योग्य वेळी योग्य प्रमाणे तपासणी करुन वसूली करीत असे. महाराष्ट्रामधील बळीराजाचे सर्व महावीरा पैकी भैरोबा, जोतिबा, नऊ खंडोबा हे प्रजेच्या हितासाठी व सुखासाठी अहोरात्र झटत होते म्हणून जोतिराव म्हणत होते--

आमुच्या देशीचे अतुल स्वामी वीर ।।
होते रणधीर ।। स्मरु त्यास ।।
बळीस्थानी आले शूर भैरोबा ।।
खंडोबा, जोतिबा महासुभा[१६] ।।

बळीच्या राज्यामध्ये सर्वत्र सुख-समृध्दी नांदत होती. वामनाने मात्र त्यांच्या राज्यावर करडीनजर ठेवली होती. 'वामन' हा इराणातून आलेल्या आर्यांचा मुख्य अधिकारी होता. बळीराजाशी युध्द करण्याच्या उद्देशाने एकाएकी तो सरहद्दीवर आल्याने बळीराजाने सर्वत्र सांडणीस्वार पाठवून मर्यादित फौजेसह वामनास थोपवण्याचा प्रयत्न केला. पंधरा दिवस वामन बळीराजाचे युध्द सुरु होते. पुढे अश्विनशुध्द प्रथमेपासून शुध्द अष्टमी पर्यन्त बळीराजा वामनाशी सलग निकराने लढले. शुध्द अष्टमीस

बळीराजा रणात पडले. ही बातमी समजताच त्याची राणी विंध्यावळीने स्वत:स एका चितेमध्ये जाळून घेतले. त्या दिवसापासून सती जाण्याची वहिवाट पडली असावी असा तर्क निघतो.[१७]

बळीराजाच्या वधामुळे वामन मदमस्त झाला. अश्विनशुध्द दशमीस शहरात जाऊन कुणी पुरुष नाही अशी संधी पाहून वामनाने सर्व स्त्रियांवर अत्याचार केला. अंगणाचे सोने लुटले म्हणून जोतिराव म्हणतात --

आर्यभट आले सुवर्णा लुटीले । दोत्री दास केले बाप मता ।।

आजही बळीराजाची कणकीची मुर्ती बनवून आपट्याच्या पानाच्या देठाने त्याचे पोट फाडून, लाथाडणारा ब्राह्मण समाज आढळतो. विजयादशमीस सोने लुटणे सिमोल्लंघन हे शब्दप्रयोग आढळतात. आपट्याची पाने एकमेकांस देऊन वैरत्व विसरुन बंधुभावाने नाते प्रस्थापित करण्याचा संदेश एकमेकांना दिला जातो .

वामनाने केलेला अत्याचार झाकून टाकण्यासाठी खोटया कथा रंगविल्या, वामनाने मागितलेली तीन पावले जमीन याबाबतची कथा सर्वांनाच अतिशोक्तीचा कळस वाटते. पहिल्या पावलात सर्व पृथ्वी व्यापणारा बंट्या दुसऱ्या पावलात जर सर्व आकाश व्यापून टाकतो तर त्याचे धड केवढे असावे ? असे अनेक प्रश्न जोतिरावासमोर निर्माण होतात म्हणून ते म्हणतात --

वामन का घाली बळी रसातळी ।।
प्रश्न जोतीमाळी ।। भय करी ।।

इराणातून आलेल्या वामनादि आर्यांनी खूप मोठा गहजब माजविला. सामान्यांना जीवन जगणे अवघड करुन ठेवले. उच्चवर्णीयांनी धर्मांच्या नावाखाली सर्वांना पिडले. गुलामगिरीत वावरताना बऱ्याच वेळा क्षात्रिय स्त्रिया म्हणत असत --'इडापिडा जावो आणि बळीचे राज्य येवो' यावरुनच बळीराजा व त्याचे महात्म्य लक्षात येते. फुले सामान्य जनतेस बळीच्या राज्यातील सुखसमृध्दीचे स्मरण करण्यास सांगून उच्चवर्णीयांनी प्रस्थापित केलेल्या हिंदुधर्मातील जाचक तत्वांचे उच्चाटण करण्यास

प्रवृत्त करतात. बहुजन समाजाचे लक्ष इस्लाम, ख्रिस्ती धर्म तत्वाकडे केंद्रित करण्याचा प्रयत्न करतात. इस्लाम धर्माची स्थापना करणाऱ्या हजरत महंमद पैगंबर यांना जोतिराव ' मानव महंमद ' संबोधतात. सर्वत्र बंधुत्व सुख समृध्दी प्रस्थापित करणाऱ्या बळी राजाची ज्याप्रमाणे जोतिराव स्तुती गातात त्याचप्रमाणे ' हजरत महंमद पैगंबरां ' चे महात्म्य गातात.

हजरत महंमद पैगंबर --

जगातील प्राचीन धर्मापैकी इस्लामधर्म हा एक होय. या धर्माच्या उदयास जगातील अनाचारच कारणीभूत ठरला. अरबस्थानमधील स्त्रियांवर अत्याचार, गरीबांना वेठीस धरणे, या सारख्या प्रकारांना ऊत आला होता. याच दरम्यान, ' महमंद पैगंबरांनी समाजसुधारणेबाबत खूप चिंतन केले. अखेर अखंडपणे वयाच्या पस्तीसाव्या वर्षापर्यन्त हिरीरीने समाजकार्य केले. एकाकीपणेच त्याची ही धडपड सुरु होती म्हणून जोतिराव म्हणतात --

नव्हता कोणी त्याला तेव्हा सहाय्यकरी ।।
एकटाच सारी ।। सत्य पुढे ।।[१८]

एकदा एका रात्री ते ध्यानस्थ बसले असता त्यांना साक्षात्कार झाला व इस्लाम धर्माची स्थापना करण्याची प्रेरणा मिळाली.[१९] सर्वसामान्यांना मानव म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त करुन देण्याच्या उद्देशाने इस्लामधर्म प्रसारास आरंभ केला. ' इस्लाम ' या शब्दाचा अर्थच स्नेहत्व, शांती अभिवादन असा आहे. धर्मप्रसार करताना खूप त्रास झाला. ' कुरेशांसारख्या कर्मठानी त्याना ठार करण्याचा प्रयत्न केला पण पैगंबर त्यातून बचावले. पुढे अनेक ढोंगी धार्मिकांनी त्यांच्या धर्मप्रसारास विरोध केला होता. त्रास कंटाळून त्यांनी एक वेळ आपल्या अनुयायांना ' हबश ' येथे जाण्यास सांगितले. प्रसाराचे कार्य अखंडपणे सुरु होते त्यांच्या या खडतर व्रताबाबत जोतिराव म्हणतात--

ढोंगी धार्मिकांनी पाठलाग केला ।।
विवरी लपला डोंगराच्या ।।
इश रक्षी त्याला अंड वधू गेले ।।
शोधीत फिरले सर्व व्यर्थ ।।

पुढे त्यांना असंख्य शिष्य मिळाले. मदीना शहराची सत्ताही त्यांच्याकडे आली. त्यांना अनेक युध्दे करावी लागली. त्यामध्ये महंमदानी विजयपताका फडकविली. म्हणून जोतिराव म्हणतात —

महमद झाला जवामर्द खरा ।।
त्यागीले संसारा सत्यासाठी ।।

लोक कल्याणासाठी त्यानी ` कुराण ग्रंथ ` लिहिला. सर्व जगाच्या पालक असणाऱ्या निर्मिकास अंत:करणपूर्वक वंदन करण्याचा व सत्याचरण करण्याचा उपदेश केला. सर्व विश्वबंधूत्व प्रस्थापित करण्यासाठी समाजात बोकाळलेला अधर्म, मतभेद मोडून काढले. मूर्तीपूजेचे अवडंबर माजविणाऱ्या ढोंगी धर्मगुरुचे ढोंग उघडे पाडले. काही ढोंग्यांना ईश्वरचिंतनाचा सद्मार्ग दाखविला. महंमद पैगंबरानी ८ जून ६३२ साली जगाचा निरोप घेतला.[२०] त्यांच्या मृत्युनंतरही अनेकांनी शिष्यत्व पत्करले म्हणून जोतिराव म्हणतात —

मेल्यामागे बहू त्यांचे शिष्य झाले ।।
बळीस्थानी आले किती एक ।।

हिंदुधर्मावर आणि समाजावर इस्लाम धर्माचा खूपच प्रभाव पडला. भारतातील तत्कालीन सामाजिक व धार्मिक अवस्था विस्कळीत होती. ब्राह्मणांचे वर्चस्व सर्व समाजावर होतेच अशा परिस्थितीमध्ये मुसलमानी स्वाऱ्या होऊन त्यानी पंजाबमध्ये प्रवेश केला. भारतातही इस्लाम धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. इस्लाम धर्माच्या तत्वप्रणालीचे अवलोकन करुन अनेक हिंदु धर्मियांनी इस्लाम धर्म स्वीकारला. यासाठी प्रथम इस्लामधर्मियांना धर्म प्रसारार्थ कोणताही प्रयोग करावा लागला नाही. अल्पसंख्यांक लोकांनी मोठ्या प्रमाणात इस्लाम धर्म स्वीकारला पण एकेकाळी (१३०९ ते १३२४ ) हजारों हिंदूना बळजबरीने मुसलमान बनविले जात होते.याबाबत एकनाथ म्हणतात —

तुर्ककी निष्ठा पाई। हिंदू को पकडकर मुसलमान करो ।।[२१]

यावरुनही बाटाबाटवी बळजबरीने होत होती असे सिध्द होते. धर्म त्याग करण्यापेक्षा देशत्याग करुन जाणाऱ्या असंख्य लोकांना इस्लाम धर्मियांनी ठार केले. पण धर्म प्रसार चालू ठेवला पण बदलत्या कालखंडानुरुप इस्लाम धर्माची तत्वे लोकांना पटली असावीत त्यांनी जातीभेद नष्ट करुन सर्वांना बंधुत्वाचे वर्तन दिले म्हणून जोतिराव म्हणतात —

आर्यधर्म मंड इस्लामे फोडीले ।।
ताटात घेतले ।। भेद नाही ।।
मांगासह आर्या नेले मसिदीत ।।
गणी बांधवात ।। आप्त सखे ।।

इस्लाम धर्मातील तत्वप्रणालीस वश होऊन लाखो लोकांनी धर्मांतर केले म्हणून हिंदुधर्मातील कर्मठ पंडित आकांडतांडव करु लागले. पण इस्लामधर्माने आपल्या धर्म छत्राखाली आश्रय दिला आणि दास केलेल्या दस्यूंना त्यानी मुक्त केले म्हणून जोतिराव म्हणतात --

आर्य दस्यू इस्लामाने मुक्त केले ।।
इशाकडे नेले सर्वकाळ ।।

मानव म्हणून जगण्याचा अधिकार हरवून बसलेल्या शूद्रातिशूद्रांना आपल्या धर्मात समाविष्ट करुन त्याचा हक्क पुन्हा प्राप्तकरुन देण्याचे महानकार्य इस्लाम धर्माने केले म्हणूनच जोतिराव या धर्मसंस्थापकास ' मानव महंमद ' म्हणतात --

आर्यभटांची सदोष तत्वप्रणाली --

इस्लाम धर्माचा प्रसार पाहून आर्यभट चळवळ करु लागले. इस्लाम धर्मापेक्षा हिंदुधर्मश्रेष्ठ असल्याबाबत समाजास पटवून सांगू लागले. भारतावर अनेक स्वाऱ्या करणाऱ्या मुस्लीम लोकांचा हा धर्म जुलमी ' असल्याबाबत आर्यभट सर्वत्र डांगोरा पिटू लागले पण भटांच्या पाशातून शूद्रांना मुक्त करण्याचे महान कार्य इस्लाम - धर्मानेच केल्याचे जोतिराव ठामपणे सांगतात, याबाबत ते आर्य भट्टांनाच सवाल करतात--

भटपाशातून शूद्र मुक्त केले ।।
इशाकडे नेले ।। कोणी दादा ।।
देशामाजी कोणी उन्माद तो केला ।।
शूद्र वागवीला ।। दासापरी ? ।।

बहुजन शूद्रातिशूद्रांना पशुतुल्य वागविले मात्र त्यांनी आपल्या पूर्वजांबाबत वाटेल - - तशी अतिशयोक्तीपूर्ण ,स्तुतिवर्णने गायली. कच्छ, मच्छ, वराह, नृसिंह, ब्राह्मण, ब्रह्मा इत्यादी पूर्वजपरंपरा निर्मिकाचे जणू स्वामी मानले. परशुरामासारख्यानी तरी निरापराध बालक, स्त्रियांचा अनन्वित छळ केला तरीही त्यांना आर्यभट

ईश्वरतुल्य मानतात. स्वत:चे दोष,चुका लपविण्यासाठी आर्य वाटेल त्या युक्त्या लढवितात आणि स्वत: श्रेष्ठ असल्याचा बहाणा करतात.

सर्वसामान्यांचा छळ करणे ही त्यांची तत्वप्रणालीच होती. शिक्षणाच्या सामर्थ्यावर मोठमोठे हुद्दे मिळवून ते आपल्या अधिकाराचा गैरवापर करीत असत. आपणा पेक्षा वरचढ होणाऱ्या इस्लामधर्मीय मुसलमानास नीच वृत्तीचे समजून त्याच्यावर सतत टीका करीत असत.

जोतिराव फुले पुरोहितवर्गाच्या आचार-विचारावर परखड टीका करतात. यज्ञामध्ये पशूहत्या ,शूद्रांवरील अन्याय याबाबत त्यांचे पाषाण हृदय केव्हाच हेलावत नाही. देवधर्म, तीर्थयात्राच्या नावांनी शूद्रांना लुबाडणे हा त्यांचा जणू पिढीजात व्यवसाय होता.सत्यनारायणाच्या पुजाविधिची मांडामांड करून द्रव्य लुट करत असत.मटाप्रमाणे मटणींच्या आचार विचारातून त्यांची नैतिक पातळी समजते.त्यांच्या रंगेलपणाबाबत जोतिराव म्हणतात --

रोज घाली वेणी भांगात गुलाल ।।<br>
सोडी बहुलाल ।। चालताना ।।<br>
अंगी कर्मवीर भुवया कमानी ।।<br>
शर नेत्रातून ।। सोडी नित्य ।।

जोतिरावांनी स्त्रियांचे सूक्ष्मावलोकन केले आणि त्यांच्या वर्तनावरही टीकेची झोड उठविली.आर्य स्त्रिया स्नानानंतर धाब्यावर बसून आपला केश-संभार वाळवितात. डोक्यावर पदर घेण्याचा सुसंस्कृतपणा त्यांच्याकडे कधीच नसतो.त्यांचा देह म्हणजे वाईट भावना विकारांचे आगारच होय. नट्टापट्टा करून स्वत:चे अंग प्रदर्शन करण्यात त्यांना वेगळेच समाधान लाभत असते. आर्य तरुणही बऱ्याच प्रमाणात बेताल आणि विषयलंपट आढळतात.

आर्यांचे दास बनलेल्या शूद्रांनी भुकेसाठी हलाल,जनावरांचे मांस खाल्ल्याने मट त्यांना अस्पृश्य समजतात. पण मांस,मच्छर,सोमरसावर यथेच्छ ताव मारणाऱ्या मटांच्या आहाराबाबत जोतिराव म्हणतात --

सोमरस दारु यज्ञी मट पिती ।।<br>
गाईमांस खाती ।। हाय हाय ।।

आपले आचरण शूद्रापेक्षा हीन दर्जाचे असताना सत्याचरणाचे धडे जनतेला देणाऱ्या पुरोहित-वर्गाबाबत जोतिरावांच्या मनात धगधगता संताप आहे. जोतिराव त्यांना ढोंगी, धूर्त, स्वार्थी, भोंदू, निलाजरे अशी विविध गुणविशेषणे लावतात. हीन दर्जाची नीतिमत्ता व आचारसंहिता असणाऱ्या आर्य धर्मपंडितांचा आर्यधर्म श्रेष्ठ असेल काय ? त्यांनीच धर्मग्रंथ लिहिल्याने त्यातील तत्वप्रणाली कोणत्या दर्जाची असेल याची जाणीव सहजपणे होते. आर्यधर्माच्या तत्वप्रणालीमध्ये बदल करण्यासाठी जोतिरावांनी खूप प्रयत्न केले. विविध तंत्रांचा अवलंब केला. पत्रव्यवहाराच्या माध्यमातूनही त्यांनी धर्मसुधारणा करण्याचे ठरविले, त्यांचे हे एक वैशिष्ट्यपूर्ण तंत्र होय.

पत्रव्यवहार - तंत्र --

समाजातील तळागाळातील व्यक्तिपासून संस्थानिकांपर्यन्त सर्वांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने जोतिरावांनी काही थोर व्यक्तींना पत्रव्यवहार करुन समाजाचे वास्तवचित्र रेखाटले. बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव गायकवाड, मामा परमानंद, बडोद्याचे दिवान लक्ष्मण जगन्नाथ आणि गंगाराम भाऊ म्हस्के वकिल इत्यादिंना पत्र पाठवून समाजाची दैन्यावस्था सांगितली. मजकुरासाठी त्यानी पद्यमय शैलीचा वापर केला. आदर्श 'लोकपाल' म्हणून प्रख्यात असणाऱ्या 'श्री महाजन सयाजीराव गायकवाड' यांना पत्र पाठवून शूद्रांबाबत आर्यांजीच्या मनातील कपटी भावना विषद केली. आर्यांनी शूद्रांना शिक्षणापासून दूर ठेवून पशुतुल्य वागणूक दिली, त्यांना आपल्या सेवादास्यासाठी कायम स्वरुपाचे गुलाम बनविले अशा अक्षरशून्य शूद्रांबाबत विनंती करताना जोतिराव म्हणतात :--

> अक्षरशून्य शूद्रादिका काहीच कळेना।।
> अशा मुक्यांचे बाप आता तुम्हीच का व्हाना ।।
> येऊ द्या दया मना ।। भटे केली दैना ।।

भटशाहीने समाजातील केवळ शूद्रांचीच दैना केली नाही, तर अहोरात्र शेतात कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यास राजरोसपणे लुबाडले. इंग्रजांना दिलेली अधिकारशाही व भटशाहीच्या प्रचंड मोठ्या विळख्यात शेतकऱ्यास पिळून काढले. कष्टकरी मजुरांना शेतकऱ्यांना, शूद्रांना लुबाडून स्वत: नर्तकीच्या नृत्यगायनात मौज करतात. स्वत:

नीतीभ्रष्ठ वर्तन करून विवेकीपणाने उजळमाथ्याने समाजात वावरतात.

जोतिरावांनी मामा परमानंद यांना पुण्यातून २ जून १८८६ साली एक पत्र पाठविले होते.या पत्रातूनही जोतिरावांची शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेबाबतची तळमळ जाणवते.शेतकऱ्यांच्या दीनवाण्यापरिस्थितीचे चित्र रेखाटणारा ' शेतकऱ्याचा आसुड' हा ग्रंथ बडोद्याचे सरकार सयाजीराव गायकवाड यांना पाठविण्याचा उल्लेख आहे.[२२] कलकत्याचे ' हरमास' व अष्टपैलू गव्हरनर जनरलसाहेब यांनाही प्रत पाठवून शेतकऱ्यांची दयनीय अवस्था सांगितली .शेतकऱ्यां वरील जुलूम नष्ठ झाल्याशिवाय देशात समृध्दी व सुख-शांती नांदू शकणार नाही. याची जाणीव जोतिरावांनी सत्ताधारी लोकांना करून दिली होती.'मामा परमानंदा'नाही आसूडाची एक प्रत पाठविण्याचे आमीष त्यानी पत्राव्दारे दिले. श्रीमंत सयाजीरावांना जोतिराव शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेविषयी म्हणतात ---

कष्टकरी शेती खाती चटणी भाकरींना ।।
वर्षासने भटजी नेती खुल्ला खजीना ।।

रात्रंदिन काबाडकष्ठ करून शेतकऱ्यांना पोटभर जेवणही मिळत नाही पण आर्यभट मात्र शेतकऱ्यांच्या मुंड्या मुरगुळून त्यांच्या श्रमावरील पंचपक्वांनावर ताव मारून डेरेदार पोटास कुरवाळीत पलंगावर लोळतात. म्हणून जोतिराव सरकाराना प्रार्थना करतात --

कष्टाळूची दैना दाविली मुख्य प्रधाना ।।
दयानिधी आहा म्हणूनी लिहले पदांना ।।
जोतिराव सयाजीरायाला करीतो प्रार्थना ।।
वाहत्या गंगेमध्ये एकदा हात का धुवाना ।।
येवू दया, दया मना, दयामना ।। भटे केली दैना ।।

समाज आणि धर्म सुधारणेच्या या प्रवाहात श्रीमंतरावासारखे लोकपाल समाविष्ठ झाल्यास आपल्या ध्येयसिध्दीस खूप गती येऊ शकेल म्हणून जोतिराव पत्रव्यवहाराच्या तंत्राचा वापर करून आपला "प्रबोधन प्रवाह" शक्तीशाली बनविण्याचा प्रयत्न करतात.

'लक्ष्मण जगन्नाथ वैद्य'नावाचे एक कर्तृत्ववान पुरुष १८८६ सालच्या ऑगस्ट महिन्यात बडोद्याचे दिवाण झाले. त्यांना पत्र पाठवून जोतिरावांनी जातिभेद निर्मुलनाचा उपदेश प्रकट केला आहे.[२३] श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या प्रेरणेने भटशाहीचे उच्चाटन होऊन मांग भटामध्ये ऐक्य प्रस्थापित होऊ शकेल, त्यामुळे खऱ्या अर्थाने बंधुभाव निर्माण होईल अशी जोतिरावांची अपेक्षा आहे. देशाची सर्वांगीण सुधारणा करणे हे मुख्यप्रधानाचे नैतिक कर्तव्य आहे. देशाची सर्वांगीण सुधारणा लोकोध्दारातून होऊ शकते. जांभेकर, लोकहितवादी, फुले सारखे अनेक समाजसुधारक देशाच्या सर्वांगीण सुधारणेसाठी रात्रंदिवस झटत होतेच म्हणून जोतिराव म्हणतात--

देशसुधारासाठी आमच्या रात्रंदिन ध्यानी ।।
मांग भटा ऐक्य करु बसवू पंक्तीनी ।।

जातीय ऐक्याबाबत सर्वांनीच एकजुटीने कार्य करावे आणि या कार्यास यश लाभो अशी अभिलाषा मनी बाळगावी हे जोतिरावांचे तत्वच होते. यावरुन त्यांची शूद्रातिशूद्रांबाबत आंतरिक तळमळ जाणवते. शूद्रांना त्यांचा मानवी हक्क प्राप्त करुन देणे यालाच लोकोध्दार म्हणता येईल.' लक्ष्मण जगन्नाथ वैद्य ' या कर्तृत्ववान पुरुषास त्यांच्या राजकारभाराचे कामी यश चिंतून लोकोध्दाराचे ध्येय मनी बाळगावे अशी अपेक्षा जोतिराव करतात.

जोतिराव फुले यांनी गंगाराम भाऊ मस्के वकिलास पत्रोत्तर दिले होते. लोखंडे मस्के, मालेकर, यासारखे त्याचे जवळचे सहकारी असूनही काही वेळा जोतिरावांचे व त्याचे पटत नसे. जोतिरावांच्या ठिकाणी हट्टाग्रही, काहीसा एककल्ली स्वभाव वगैरे दोष होते. मस्के वकिलाच्या प्रश्नोत्तरात बाह्मणसमाजाची हीन दर्जाची नीतिमत्ता व भ्रष्ट आचारसंहिता वर्णिली आहे. पोट भरण्यासाठी हे भटजी इराणातून बळीस्थानात आले आणि सामान्य लोकांवर अत्याचार करुन शिरजोर बनले. इंग्रजाकडून चांगल्या अधिकारासाठी जागा मिळवून 'नॅशनल सभा' स्थापून इंग्रजावरही कुरघोडी करु लागले. शूद्रांची हेटाळणी करणाऱ्या पुरोहितशाहीच्या उच्चाटणासाठी जोतिराव संतापाने म्हणतात --

' उठा झडकरी त्यागा सर्व जगवा शूद्रांना ।।

शद्रांमध्ये नवक्रांती निर्माण झाल्याशिवाय भटशाहीचे पाश गळून पडणार नाहीत. भटशाहीचे आचरण नीतीहीन, भ्रष्ट आहे असे सांगून या पत्राबाबत जोतिराव म्हणतात --

सत्याचरणी यश मिळवावे ।।
जगा दाखवावे ।। जोति म्हणे ।।

पुरोहितशाहीचे सत्याचरणाचा अवलंब, सर्व जगास करुन दाखविल्यास त्यांच्याबाबत असणारा तिरस्कार शद्रांच्या व समाजसुधारकांच्या मनातून सहज नष्ट होऊ शकेल पण सत्याचरणाचा त्यांनी अवलंब करणे गरजेचे आहे.

## विभाग चौथा

जोतिराव फुले आयुष्यभर मानवी दास्याविरुध्द आक्रोश करीत राहिले. पुरोहितशाहीने तो आक्रोश दाबून टाकण्याचा प्रयत्न केला. जोतिराव मात्र आपल्या ध्येयापासून तसूभरही ढळले नाहीत. ब्राह्मणी संस्कृतीच्या प्रचंड मोठ्या प्रवाहाविरुध्द जाण्याचा त्यानी चंग बांधला होता, त्यामुळे उच्चवर्णीय त्यांना धर्मद्रोही म्हणून संबोधीत असत. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे राजकीय अथवा सामाजिक पंथ स्थापन करण्याचे गुण नसून केवळ युरोपीयन ग्रंथकारांची विचारसरणी व ब्रह्मदेव यांच्या आधारावर जोतिरावांच्या मतप्रणालीची इमारत उभी राहिली आहे अशी त्यांच्यावर टीका केली जात असे. जोतिरावांच्या चळवळीबाबत असा आरोप केला जातो की एका ब्राह्मणाकडून त्यांचा एक पूर्वज मारला गेल्यामुळे चिडून संतापाने त्यांनी ब्राह्मणाविरुध्द चळवळ सुरु केली.[२४] अशा प्रकारच्या आरोपांना व टीकांना दाद न देता जोतिराव आपले कार्य अखंडपणे करीत होते. अनेक माध्यमांचा व उपक्रमांचा अवलंब करुन शद्रांना मानवी हक्क प्राप्त करुन देण्यासाठी ते सदैव झटत राहिले. स्वत:स भूदेव समजून समाजात स्वैराचार व अत्याचार करणाऱ्या जुलमी उच्चवर्णीयांच्या कतृत्वाचा पाढा जोतिराव शद्रातिशद्रांसमोर मांडतात. त्यांचा पूर्वेतिहास व अमानवी कृत्ये सर्व समाजासमोर मांडतात.

आर्यांचा अत्याचार --

आर्य एक अतिप्राचीन काळातील भटकी जमात होय. इ.स.पूर्व १००० ते १५०० या कालखंडात ते भारतात आले. भारतातील सिंधू नदीच्या सुपीक आणि समृध्द प्रदेश पाहिल्यावर तेथेच ते स्थिर झाले. आर्यांचे मुळचे वसतिस्थान कोणते हा वादाचा विषय होय. मॅक्समूलरच्या मते आर्य मूळचे मध्य आशियातील असावेत, तर काही संशोधक आर्यांचे मूळ वसतिस्थान मध्य युरोप मानतात. 'दास' व 'पावगी' यांनी भारत हेच आर्यांचे मूळ वसतिस्थान मानले.[२५] आर्य हे सामान्यत: इराणमधून आले असावेत. तिथे असणाऱ्या मूळच्या गोंड, भिल्लादि लोकांचा छळ करुन त्यास पिटाळून लावले. त्यांनी आर्यांना विरोध केला. त्यांचा पराभव करुन दास केले. परशुरामासारख्या निर्दयी ब्रह्म्य नेत्याने तर सामान्य स्त्रियांचा छळ केला. त्यांची तान्ही बाळे मारुन टाकली, त्यांच्या अमानवी कृत्याबाबत जोतिराव म्हणतात --

गर्भिणी स्त्रियांस धुंडून काढील्या ।।
जप्तीस ठेविल्या ।। अटकेत ।।
पोटी पुत्र होता परशुरामाने ।।
वधीली शस्त्राने तान्ही बाळे ।।

आर्यांनी भारतात येवून प्रचंड मोठा धिंगाणा घातला होता, त्यांनी आपले अस्तित्व आबादित राखण्यासाठी वाटेल त्या युक्त्या केल्या, कावेबाज आर्य हळुहळू धैर्यशील, सत्ताधिश बनले. पुरोहितशाहीचा हा स्वैराचार सर्व समाजासमोर मांडून त्यांच्यात प्रेरणा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. लाचारीचे जीवन जगणाऱ्या पण विद्वान शूद्रांना ते आव्हान करतात --

विद्वान शूद्रांनो जागे कारे व्हाना ।।
तपासुनी पहाना ।। ब्रह्मघोळ ।।

पुरोहितशाहीस नतमस्तक झालेल्या लाचार शूद्रांना शूद्रांच्या माऱ्यांनी जागृत केले. त्याच्यामध्ये स्वत्वाची जाणीव करुन समाजात ताठमानेने जगण्याचा कानमंत्र

दिला. आपण मानव म्हणून जन्म घेतला आहे. पशूपेक्षा हीन दर्जाचे जीवन जगणे म्हणजे मानव जातीला कलंक लावणे होय. जोतिराव फुले या शूद्र समाजास 'अज्ञानाचे राजे' असा तिरस्काराने संबोध करतात. भवितव्यात लाचारीचे दीनवाणे जीवन जगायचे होते तर जन्मत:च मृत्यूनें तुम्हांस का कवटाळले नाही? अखंड मानव जातीला कलंकित करणाऱ्या तुमच्या दुबळ्या वृत्तीची तुम्हास लाज वाटावयास हवी. अशाप्रकारे क्रोधाने शूद्रातिशूद्रांची कानउघाडनी करून जोतिराव म्हणतात --

मेल्यामागे तुमची छी: थू की होईल ।।
स्त्रीया लाजतील ।। चौघांमध्ये ।।

जोतिरावांनी शूद्रांच्या मनातील न्यूनगंड काढून टाकण्याचा प्रयत्न केला. आजपर्यन्त भोगलेल्या गुलामगिरीतून आणि लाचारीतून मुक्त होण्यासाठी धैर्य आणि पाठबळ दिले. त्यांना उपदेश करतांना जोतिराव म्हणतात पुरोहितशाहीने आपले ब्रिजकूट बाहेर पडू नये म्हणून आपणांस अज्ञानी ठेवले. पेशव्यांनी ब्राह्मणांना आश्रय देवून बहुजन समाजाचा घातच केला आहे. त्यांच्याप्रमाणे तुम्ही कृतघ्न बनून ब्राह्मणांच्या गुलामगिरीपुढे नतमस्तक होऊ नका. त्यांचे ब्रह्मकूट बाहेर आणून त्यांची भोंदूगिरी व स्वार्थी वृत्ती समाजासमोर मांडा, अशी ते व्यक्त करतात.

आदिसत्य आळवणी --

जोतिराव शूद्रांना दास्यमुक्त करण्यासाठी सदैव झटत होते. आदिसत्याच्या आरतीतून त्यांची शूद्रांबाबतची आंतरिक तळमळ जाणवते. आर्यांनी शूद्रातिशूद्रांवर केलेला अन्याय, अत्याचार, जुलूम सत्यदेवासमोर मांडला. त्याच्या मुक्ततेसाठी करुणा भाकतानाजोतिराव म्हणतात --

कृपेचा सागर बा तू सत्य जाण ।।
मुक्त केले आम्हा तू ब्रह्मपाशातून ।।
तुझ्या प्रसादाने मार्ग उमजलो ।।
माता पित्या आम्ही सेवू लागलो ।।

सत्यदेवाने दास्यमुक्त केल्यास ख-या अर्थाने तो कृपेचा सागर होऊ शकेल.कृपावंत महाप्राजळ सत्यदेवाची आळवणी करतानाही आर्यांनी सत्यनितीचा कसा लोप केला, धर्माच्या नावाखाली सर्वांना कसे पिडले याची तक्रार मांडली` बळीच्या राज्या-प्रमाणे या ब्राह्मणी राज्यात शांतता आणि सुख-समृध्दी नांदावी अशी विनवणी जोतिराव सत्यदेवास करतात.

विभाग पांचवा

जोतिरावांनी समाजातील सर्व अधिकारी-वर्गाचे सुक्ष्मावलोकन केले.पाटील, कुलकर्णी, चिटणीस,मामलेदार,कलेक्टर,न्यायाधीश, शिक्षक यासारखे अधिकारी-वर्ग आपले कार्य किती अप्रामाणिकपणे करीत होते याची जाणीव आपल्या `अखंड रचनेव्दारे` समाजास करुन दिली. पेशवाईमध्ये पुरोहितशाहीस प्राधान्य होते. आंग्लाईमध्ये ही धूर्त भटांनी इंग्रजी अधिका-यांची मने जिंकून उच्च अधिका-यांच्या जागा स्वत: पटकाविल्या. उच्चवर्णीयांच्या मनात पूर्वीपासूनच शुद्रातिशुद्रांबाबत व्देष होताच म्हणूनत्यांनी पिढयानपिढया या वर्गास गुलामगिरीतच ठेवले,त्यांची नेहमी हेटाळणी करण्यात आली.त्यांना कुठेही न्याय मिळू दिला नाही.

जोतिरावांनी त्यांच्याअखंड रचनेमधील एका अपूर्ण काव्यामध्ये अधिकारी-वर्गाचीशुद्रांवरील दांडशाही रेखाटली आहे. वास्तविक पहाता जोतिरावांनी आपले हे अपूर्ण काव्य प्रसिध्द केल्यानंतर`विविध ज्ञानविस्तारा`च्या फेब्रुवारी १८६९ मधील आठव्या अंकातून`नवीन शाहीर` या मथळ्याखाली एक लेख प्रसिध्द झाला. जोति-रावांच्या अपूर्ण काव्यावर त्यांनी परखड टीका केली आहे. त्यांना उद्देशून लेखक महाशय म्हणतात --

` कडू कारले तुपात तळले ,साखरेत घोळले ,तरी ते कडूच `

हल्ली म्हसोबाचे भक्त`जोतिबा` म्हणून कोणी उमेदवार आपली कवने पाळत असतात.[२६] जोतिरावांनी` ब्राह्मण आणि त्यांच्या अधिकारशाहीवर परखडपणे

टीका केली आहे. पेशवाईतील राजसत्ता जणू ब्राह्मणांचीच होती. ब्रिटिश राजवटीमुळे आपल्या सर्वस्वावर गदा येणार म्हणून उच्चवर्णीय इंग्रजी राजवटीवर निराश होते. तरीही प्रसंगावधान साधून ब्राह्मणी काव्याने इंग्रजांची मने जिंकून सर्व अधिकारपदे हस्तगत केली. अधिकारपदांचा बऱ्याच वेळा गैरवापर करून भ्रष्टाचाराचे खापर इंग्रजी राजवटीवर फोडत असत म्हणून जोतिराव बऱ्याच वेळा इंग्रजांना जागरुकतेचा इशारा देतात. गावचे कुलकर्णी सामान्य शेतकऱ्यांना खूप त्रास देतात. सहानुभूती कधीच दाखवीत नाहीत. शेतकऱ्यांना मंजूर केलेला 'तगाई' चा निम्मा अधिक भाग आपणच हडप करतात. मन मानेल तसा शेतसारा गोळा करतात. जरी शेतकऱ्यांना न्याय हवा असल्यास मामलेदार, कलेक्टर सारख्या अधिकाऱ्याकडे धाव घेतली तरी तिथेही ब्राह्मणवर्गच अधिकारपदावर असतो. शेतकरी-वर्ग आपला अर्ज चिटणीसाकडून लिहून घेतात. चिटणीसही ब्राह्मण समाजाचेच असल्याने ते काही महत्वाचा मजकूर वगळून अर्ज वाचतात. त्यावर कलेक्टरांची सही घेऊन अर्ज निकालात काढतात. शेतकऱ्यास योग्य न्याय मिळू देत नाहीत.

शेतकऱ्यांनी अखेर न्यायाधिशाकडे धाव घेतली असता तेथील ब्राह्मण न्यायाधिश सोवळ्यामध्येच असतात याबाबत जोतिराव म्हणतात ---

महारमांगांची दाद घेता सोवळे दावीती ।।
न्याय करिता शिव्याने समजून उजरती ।।
राग येता दुरुनी जोडे फेकून मारीती ।।
दयेला नाही जरा वस्ती ।।

उच्चवर्णीय आपल्या अधिकारपदाचा राजरोसपणे गैरवापर करीत असत. दोष मात्र इंग्रज राजवटीस देत असत. विशेषत: शुद्रातिशुद्रांना खूप छळले जात होते. ब्राह्मणअधिकाऱ्यांची दांडशाही आणि न्याय व्यवस्थेतील गोंधळ सांगून जोतिराव शिक्षण क्षेत्राकडे आपला मोर्चा वळवितात.

शिक्षण क्षेत्राच्या चाव्या समाजाने जणू ब्राह्मण-वर्गाकडेच दिल्या होत्या. ब्राह्मणाशिवाय कोणी अध्यापन केल्यास ते पाप समजले जात असे. शुद्रांना शिक्षणा-

पासून वंचीत ठेवण्याचे ध्येय ब्राह्मण पंतोजींनी उरी बाळगले होते. ते स्वजातीय विद्यार्थ्यांना बोधात्मक शासन करतात. पण शूद्रांच्या मुलांना खूप शासन करतात. शिक्षणाबाबत त्यांच्या मनात आदर निर्माण करण्यापेक्षा भीती निर्माण केली जात असे. शाळा तपासणीसाठी आलेले अधिकारी सुध्दा ब्राह्मण समाजातील असल्याने कर्मठ पक्षपाती पंतोजींनी दिलेल्या माहितीवर विश्वास ठेवतात. अकार्यक्षम आणि जातिभेद मानणाऱ्या पंतोजीस गुणी शाळा मास्तर म्हणून स्तूती करतात. प्रत्यक्षात हे पंतोजी मन मानेल त्याप्रमाणे शाळा चालवितात. इतर वेळी सर्वसामान्यांना पोथ्या-पुराणे वाचून दाखवून उपदेश करतात आणि स्वतःस विवेकी ईश्वरावतार समजतात. जोतिराव भटशाहीचा धिक्कार करुन, त्यांच्यापासून सावध राहाण्याचा इशारा देवून शूद्रातिशूद्रांतील विद्वान लोकांना अधिकारी वर्गात समाविष्ट करुन घेण्याबाबत विनंती करतात.

समारोप --

पुरोहितशाहीने हजारो वर्षे सर्वसामान्य समाजावर हुकूमत गाजविली. धर्माचे खूप मोठे स्तोम माजवून सामान्यांचे जीवन उध्वस्त केले. राजे लोकांच्यावरही त्यांचे वर्चस्व होते. पेशवाईमध्ये जरी राज्यकर्ते पेशवे असले तरी भटशाहीचे अधिपत्य होते. ब्राह्मणांबाबत सर्व थरामधील लोकांमध्ये दहशत होती. त्यांच्या आत्मिक सामर्थ्याबाबत लोकांच्या मनात भीती होती. बुद्द बादशहा सारख्या व्यक्तीलाही गुडघे टेकून धर्मगुरुंची याचना करावी लागली आहे.[२७] धर्मगुरुंनी विविध ठिकाणी धर्मपीठे स्थापन करुन सर्व समाजावर वर्चस्व प्रस्थापित केले. शूद्रांना तरी ते सूडभावनेनेच वागवीत होते. सैतानी सूड आणि सार्वत्रिक असंतोष हाच हल्लीच्या भटशाहीचा राज्यकारभार असे मत 'फॅरीनो' या विचारवंताने 'सत्य शोधक' इशारा मध्ये मांडले.

ब्राह्मणी वर्चस्वाच्या प्रचंड मोठ्या प्रवाहास विरोध करण्याचे धैर्य राजे लोकांच्यामध्ये सुध्दा नव्हते. अर्थात त्यावेळी सत्ता, संपत्ती आणि विद्वत्ता ब्राह्मण

समाजात असावी पण कालपरत्वे ब्राह्मण स्वार्थीवृत्तीमुळे भ्रष्ट झाले याबाबत रामदास म्हणतात --

> ब्राह्मण बुध्दीपासून चेवले ।।
> आचारापासून भ्रष्टले ।।
> गुरुत्व सोडून जाले ।।
> शिष्य सिपायाचे ।।

बहुजनसमाजात या वर्गाबाबत संतापाची लाट निर्माण झाली पण त्या जनलाटेमध्ये धैर्य निर्माण करणारा नेता पुढे सरसावत नव्हता. शूद्रातिशूद्रांच्या दीनवाण्या लाचार स्थितीचा विचार करुन जोतिराव फुले यांनी बहुजन समाजात स्वातंत्र्य, समता, आणि विश्वबंधुत्वाची प्रखर प्रेरणा निर्माण करुन ब्राह्मणी वर्चस्वाला प्रचंड मोठा सुरुंग लावला. सर्वसामान्य लोकांना सहजपणे समजू शकेल अशा साध्यासोप्या भाषाशैलीमध्ये आपले अब्राह्मणी तत्वज्ञान व्यक्त केले. उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाबाबतची संपप्त भावना त्यांच्या अखंड रचनेत प्रकर्षाने जाणवते.

फुले यांनी तत्कालीन समाजदर्शन, रुढी, परंपरा, शूद्रातीशूद्रांचा होणारा छळ ग्राम्य भाषेतच पण जिवंतपणे रेखाटला. पुरोहितशाहीचा स्वार्थ, कसब, जनतेसमोर मांडून सामान्य, शेतकरी समाजास जागृत केले. ' श्रीमंत सयाजीराव गायकवाड बडोद्याचे दिवाण, ' मस्के वकील ' या सारख्या मान्यवर लोकांना पत्राव्दारे सामान्य लोकांच्या अत:करणातील तीव्र वेदना विनम्रपणे सांगितल्या.' येवू द्या दया मना ' म्हणून त्यांची आळवणीही केली.

जोतिराव फुले यांनी मानवजातीच्या सत्याचरणासाठी महान दर्जाची आचार संहिता जनतेसमोर मांडली. त्याचे महत्त्व पटवून सांगितले. शुद्रातिशद्रांना स्वामीमानी जीवन जगण्याबाबतचा उपदेश केला. तो त्यांना चटकन समजावा म्हणून त्यांचीच ` ग्राम्य`भाषा वापरली अर्थात त्यांची अखंड रचना काव्य म्हणून कितपत श्रेष्ठ ठरते ,त्यातील काव्यगुण आणि विचार सौंदर्य पुढील प्रकरणी पाहू.

••

# संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १ | धनंजय कीर | म.जोतिराव फुले<br>आ.२,मुंबई ३४,१९७३,पृ.१५६ |
| २ | तुकारामाचे शंभर अभंग | श्री.म. पिंगे (संपा) |
| ३ | डॉ.शं.दा.पेंडसे | भागवतोत्तम संत एकनाथ<br>आ.२,पुणे ३०,१९८२,पृ.२१६ |
| ४ | दुर्गा,भागवत | धर्म आणि लोकसाहित्य<br>आ.१,मुंबई ३४,१९७५,पृ.२ |
| ५ | मा.स.बागल | सत्यशोधकांना इशारा किंवा नव्या पिढीचे राजकारण पृ.४७ |
| ६ | गं.बा.सरदार | धर्म आणि समाज परिवर्तन<br>आ.१, मागोवा पुणे ४,१९८२,पृ.४३ |
| ७ | कृ.पा.देशपांडे | अग्निफुले (सावित्रीबाई फुलेंची कविता स्वरुप आणि समीक्षा )<br>आ.१ नुतन पुणे ३०,१९८२, पृ.८३ |
| ८ | पी.बी.साळुंखे | म.फुले गौरव ग्रंथ<br>आ.१,मुंबई ३२,१९८२,पृ.२१६ |
| ९ | ओ.नि.ठोके | रा.ना.चव्हाण निवडक वाङ्मय<br>आ.१, पारस बेळगांव १९८६,पृ.२४५ |
| १० | गं.बा.सरदार | म.फुले व्यक्तित्व आणि विचार<br>आ.१,मुंबई २४,१९८२,पृ.९० |
| ११ | स.ग.मालशे-कीर | म.फुले समग्र वाङ्मय<br>आ.१, मुंबई ३२,१९६९,पृ.५४ |

| | |
|---|---|
| १२ सिताराम रायकर | <u>कृष्णाराव मालेकर समग्र वाङ्मय</u><br><u>(सत्यशोधक चळवळीतील म.फुले यांचे सहकारी )</u><br>आ.१,पुणे-२,पृ.९ |
| १३ वि.ल.भावे | <u>महाराष्ट्र सारस्वत</u><br>खंड-२,मुंबई ३४,पृ.९८७ |
| १४ 〃 | <u>ब्राह्मण पत्रिकेतील निवडक लेख</u><br>पृ.१६५ |
| १५ जोतिराव फुले | <u>गुलामगिरी</u><br>आ. ., मुंबई २८,पृ.२१ |
| १६ मालशे-कीर | <u>म.फुले समग्र वाङ्मय</u><br>आ.१,मुंबई ३२, १९६९,पृ.४८९ |
| १७ जोतिराव फुले | <u>गुलामगिरी</u><br>आ. ., मुंबई २८, पृ.२५ |
| १७ मालशे कीर | <u>म.फुले समग्र वाङ्मय</u><br>आ.१,मुंबई ३२, १९६९,पृ.४८९ |
| १९ गायकवाड-भोसले | <u>मानव जातीची कथा</u><br>रविल पब्लिकेशन सातारा, १९७२,पृ.११५<br>आ.१. |
| २० गायकवाड भोसले -पाटील | <u>मानव जातीची कथा</u><br>रविल पब्लिकेशन सातारा,पृ.११५ |
| २१ डॉ.शं.दा.पेंडसे | <u>भागवतोत्तम संत एकनाथ</u><br>आ.२,पुणे ३०,१९८२,पृ.४ |

| | |
|---|---|
| २२ मालशे-कीर | म.फुले समग्रवाङ्मय |
| | आ.१, मुंबई ३२, १९६९, पृ.३२५ |
| २३ धनंजय कीर | म.जोतिराव फुले |
| | आ.२, मुंबई ३४, १९७९, पृ.२५२ |
| २४ | ब्राह्मण पत्रिकेतील निवडक लेख |
| | उनि पृ.१२२ |
| २५ गायकवाड, भोसले ,पाटील | मानव जातीची कथा |
| रा.ज्ञा. रा.ह. वि.म. | आ.१,सातारा १९७२,पृ.५६ |
| २६ विविधज्ञानविस्तार | अंक ८वा, सन १८६९, पुस्तक २रे, पृ.११९. |
| २७ मा.स.बागल | उनि पृ.८ |


..